# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २२ जुलै, २०१५ / आषाढ ३१, १९३७ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री**
} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११४**

---

### ठाणे जिल्हयातील अनुसूचित जमातीसाठी असलेले २२ टक्के आरक्षण ७ टक्के करण्याबाबत

**(१) * ८०७३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींची लोकसंख्या विचारात घेता विभाजनापूर्वी ठाणे जिल्हयासाठी अनुसूचित जमातीकरिता आरक्षणाची टक्केवारी २२ टक्के होती, हे खरे आहे काय,

(२) ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन पालघर जिल्हयाची निर्मिती झाल्याने ठाणे जिल्हयासाठी अनुसूचित जमातीकरिता ठेवलेले आरक्षण २२ टक्के वरुन ७ टक्के करण्यात यावे असे निवेदन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

आदिवासी जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये दि. ६ जून, १९७२ च्या शासन निर्णयान्वये ठाणे जिल्हयाकरिता अनुसूचित जमातीकरिता सरळसेवा भरतीसाठी वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांकरिता २२ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी पोलीसांनी दाखल केलेल्या खोट्या गुन्ह्यांची सीआयडी चौकशी करणेबाबत**

**(२) * ७२६९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक व इतर अधिकाऱ्यांनी सुड बुध्दीने व मानहाणी करण्याच्या हेतूने स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी व स्थानिकांविरुध्द खोटे गुन्हे नोंदवून मानसिक व शारिरीक त्रास देण्याच्या प्रकाराची सीआयडी चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधींनी मा.राज्यपाल महोदय व मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वग्रह दुषित हेतूने एकाच दिवशी ६-७ खोटे गुन्हे नोंदविणे, तसेच सर्व प्रकरणांमध्ये तेच आरोपी दाखवित पदाचा दुरुपयोग करणे असे प्रकार करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची सीआयडी मार्फत चौकशी करुन त्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींना अवमानकारक वागणूक व कायद्याचा व पदाचा दुरुपयोग करणाऱ्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांवर विहित मुदतीत कारवाई न करता त्यांचा बचाव करण्याचे धोरण मुख्य सचिव स्तरावरुन राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) नाही.

पाथरी पोलिसांनी पुर्वग्रह दुषित हेतूने कोणावरही गुन्हे दाखल केलेले नाहीत. जे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ते रितसर फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुनच दाखल करण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणात कोणीही पोलीस अधिकारी दोषी नसल्याने त्यांची सीआयडी चौकशी करणे किंवा त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांना निलंबित करण्याचा प्रश्नच येत नाही.

पोलीसांनी कोणालाही अवमानकारक वागणूक दिलेली नाही, रितसर कायदेशीर कार्यवाही केलेली आहे.

(४) सदर प्रकरणी कोणीही अधिकारी दोषी नसल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

-----------------

## मुंबईतील आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांत निर्माण झालेली पाणी टंचाई

**(३) * ७३५२ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीतील आदिवासी पाडयात महापालिकेने २० कोटी रुपये खर्च करुन नळजोडणी आणली, मात्र या नळजोडणीला पाणी नसल्यामुळे या आदिवासी पाड्यांवर पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीत २७ आदिवासी पाडे असून जवळपास ४००० ची लोकवस्ती आदिवासी पाड्यांमध्ये आहे, वर्षानुवर्षे राहत असलेल्या या आदिवासी पाड्यांमध्ये आजही नागरी सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदिवासी पाड्यातील आदिवासी महिलांना बोअरवेल तसेच विहीरीचे पाणी पिण्यासाठी वापरावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार सदर पाड्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेमध्ये एकूण १४ प्रस्ताव मंजूर झाले होते.

त्यापैकी ११ ठिकाणी काम पूर्ण झाले असून या ११ ठिकाणांमध्ये एकूण २२ आदिवासी पाडे समाविष्ट आहेत. सदर २२ आदिवासी पाड्यांपैकी १८ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

उर्वरित ४ ठिकाणी आदिवासी पाड्यांमधून यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्यापि पाणी पुरवठा सुरु करता आलेला नाही.

उरलेल्या ३ प्रस्तावांपैकी २ ठिकाणी चित्रनगरी व १ ठिकाणी फोर्स वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे ५ आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा होऊ शकलेला नाही.

(२) आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांत नागरी सुविधांचा अभाव आहे हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) आरे वसाहतीतील १८ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

४ आदिवासी पाड्यांमधून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्यापि पाणी पुरवठा सुरु करता आलेला नाही.

५ आदिवासी पाडयांसाठी चित्रनगरी व फोर्स वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे सदर ठिकाणच्या पाडयांना पाणी पुरवठा करता आलेला नाही.

-----------------

## रिसोड (जि.वाशिम) नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत

**(४) * ७४१२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्याधिकारी नगर परिषद रिसोड, जि.वाशिम यांना तात्काळ निलंबित करणे, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करणे आणि फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत रिसोड नगरपरिषदेतील सर्व नगरसेवकांनी प्रधान सचिव (नवि-२) नगरविकास विभाग यांचेकडे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीवर तात्काळ कार्यवाही न केल्यास दिनांक २० मे, २०१५ पासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर आमरण उपोषणास बसणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार शासन स्तरावर पुढे काय कार्यवाही केली आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय. उपविभागीय अधिकारी, रिसोड यांनी श्री. इंगोले यांची चौकशी करुन ते दोषी असल्याचा अहवाल सादर केला होता व त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी सहमती दर्शविली आहे.

(४) जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल, नगरपरिषद सदस्यांकडून प्राप्त तक्रारी, तसेच राज्य निवडणुक आयोगाने केलेली शिफारस इत्यादीचा विचार करुन सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने श्री.दिपक इंगोले, मुख्याधिकारी यांची दि. १२.०६.२०१५ च्या शासन आदेशान्वये अन्यत्र बदली करण्यात आली आहे.

सदर आदेशास मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी जैसे थे (Status Quo) आदेश दिला आहे.

-----------------

**मुंबईतील काळबादेवी येथील इमारतीला लागलेली आग**

**(५) * ७७९४ श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.कपिल पाटील, श्री.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.अनिल परब, श्री.विजय गिरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळबादेवी येथील गोकूळ निवास इमारतीत दिनांक ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या भीषण आगीमध्ये इमारत कोसळून अग्निशमन दलातील तीन अधिकाऱ्यांचा मृत्यु व सहा जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या श्री.महेंद्र देसाई, श्री.संजय राणे व श्री. सुधीर अमीन यांना हुतात्मा घोषित करुन त्यांच्या दोन मुलांचा शिक्षणाचा खर्च मुंबई महानगरपालिकेने उचलावा आणि त्यांना कायमस्वरुपी नोकरी देऊन मुख्यमंत्री कोटयातून एक फ्लॅट देण्याची मागणी त्यांच्या कुटूंबियांनी महापालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कर्तव्य बजावत असताना मृत्यूमुखी पडणाऱ्या अग्निशमन दलातील जवान व अधिकारी यांच्या कुटुंबियांना निर्वाहाचे साधन देणेबाबत व सदर कर्मचाऱ्यांचा ५० लक्ष रुपये पर्यंतचा विमा उतरविणे बाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) आगीच्या दुर्घटनांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच अग्निशमन जवानांना अत्याधुनिक साधनसामुग्री व यंत्रणा पुरविण्यासंदर्भात आणि याविभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर दुर्घटनेमध्ये अग्निशमन दलाच्या ४ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यु झाला तसेच ५ अग्निशमन दलाचे कर्मचारी व ६ व्यक्ती जखमी झाल्या होत्या.
(२) हे खरे आहे.
(३) कर्तव्य बजावत असतांना मृत्युमुखी पडणाऱ्या अग्निशमन दलातील जवान व अधिकारी यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे रोख रक्कम देण्यात आलेली आहे.

सदर घटनेत मृत पावलेल्या दोन अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्यात आली असून, उर्वरित २ अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना वैयक्तिक अडचणीमुळे सद्यपरिस्थितीत त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. तथापि योग्य वेळी त्यांच्या कुटुंबियांच्या मागणीप्रमाणे महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यात येईल.

या व्यतिरिक्त अग्निशमन दलातील अधिकारी व जवान यांना रुपये पाच लाखापर्यंत गट विमा योजना लागू करण्यात आली आहे.
(४) आगीच्या दुर्घटनांचा सामना करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडे उपलब्ध असून, त्यामध्ये पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्वीपमेंट (पी.पी.ई) श्वसन उपकरणे यंत्रे विविध प्रकारचे रेस्क्यू गियर्स व आधुनिक दळणवळण साधने यांचा समावेश आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्यासंबंधी कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ शहरात शालेय पोषण आहारातील तांदूळ खुल्या बाजारात विकल्याबाबत**

**(६) * ७८४७ श्री.संदिप बाजोरिया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात विद्यार्थ्यांसाठी आलेला शालेय पोषण आहाराचा १३१ कट्टे तांदूळ कलश ब्रान्डच्या नावाखाली खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना विभागीय पोलीस अधिकारी यांनी पकडल्याची घटना दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली तसेच हजार क्विंटल तांदूळ असलेले गोडावून सिल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २१ मार्च, २०१५ रोजी यवतमाळ शहरात विद्यार्थ्यांसाठी आलेला शालेय पोषण आहाराचे ४० कट्टे तांदूळ कलश ब्रान्डच्या नावाखाली खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना विभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी पकडला आहे.

९१ कट्टे तांदूळ असलेले गोडाऊन सिल करण्यात आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी गुन्ह्याचा तपास केला असता असे आढळून आले की, मुलांचे शालेय पोषण आहाराचे तांदूळ वाहतूक करुन पुरविण्याचे काम ठेकेदार विनोद रमेशराव डोंगरे यांना देण्यात आले होते. त्यांनी अरशद बेग यांच्यासोबत करार करुन त्यांना वाहतूक करण्यासाठी नेमले होते. अरशद बेग यांनी पांढरकवडा बायपास रोड येथे गोडाऊन भाड्याने घेऊन तेथे तांदूळ ठेवले होते. त्यातील तांदूळ खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना अरशद बेग यांना पकडण्यात आले. या प्रकरणी अरशद बेग व त्यांच्या वाहनचालकाविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे गु.र.क्र.३०४५/२०१५, जीवनावश्यक वस्तु अधिनियम कलम ३, ७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यांच्याविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर महानगरपालिकेने माजी सैनिकांना मालमत्ताकरात सूट देण्याबाबत पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(७) * ७३२० श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने सुमारे ३ वर्षापासून माजी सैनिकांना मालमत्ताकरात सूट देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, हा प्रस्ताव नगर रचना विभागाकडे तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्ताव प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत, तसेच शासनाने याबाबत चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्याकडून प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिकची माहिती मागविली असून माहिती प्राप्त झाल्यानंतर सत्वर निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(८) * ६९८० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयंत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाकोला पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाने त्यांच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याची हत्या करुन स्वत:ही आत्महत्या केल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर हे राज्यात आत्महत्येमध्ये दुस-या क्रमांकावर असून नागपूर मध्ये आतापर्यंत किती पोलीसांनी आत्महत्या केल्या आहेत,

(३) असल्यास, राज्यातील विविध भागामध्ये याप्रकारच्या घटना सातत्याने घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात मुदतपुर्व आणि विनाकारण करण्यात येणाऱ्या बदल्यांमुळे, पोलीस दलात असलेल्या रिक्त पदांमुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण-तणाव निर्माण होऊन उक्त प्रकारच्या घटना घडत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रिक्त पदे भरण्यासंदर्भात व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नागपूर शहर या घटकात सन २०११ ते २०१४ पर्यत एकूण १६ पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत.

(३) राज्यामध्ये सन २०११ मध्ये २८, सन २०१२ मध्ये २७, सन २०१३ मध्ये ४३ व सन २०१४ मध्ये ३७ पोलीस आत्महत्येच्या घटना घटलेल्या आहेत.

(४) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या अध्यादेशानुसार विहित नियमानुसार करण्यात येतात. पोलीस अंमलदारांच्या बदल्यासाठी शासन अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन बदली समिती गठीत करण्यात येते व त्या समितीद्वारे बदल्या संदर्भातील मार्गदर्शन सुचनानुसार बदली पात्र अंमलदारांच्या बदल्या करण्यात येतात. तसेच बदली समितीमार्फत झालेल्या बदल्यामध्ये काही गैरसोईची नियुक्ती असल्यास त्या अंमलदारास वरिष्ठ अधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी आज्ञांकीत कक्षात आपली समस्या मांडण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते व त्यांच्या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो.

प्रशासकीय बदलीपात्र कालावधी पुर्ण झाल्यावर तसेच विनंतीनुसार पोलीस कर्मचारी यांनी दिलेल्या पसंतीच्या ठिकाणी प्रशासकीय बाबी विचारात घेऊन, शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे बदल्या करण्यात येतात.

(५) राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार रिक्त पदे भरण्यात येतात. पोलीसांचे आरोग्य उत्तम रहावे तसेच कामाचा ताण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केली आहे.

(१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येते.

(२) बी.एम.आय. चाचणी करुन प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो.

(३) पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या अडीअडचणी, तक्रारी सोडविण्यासाठी कर्मचारी वृंद परिषदेचे आयोजन करण्यात येते. तसेच आज्ञांकित कक्ष व दरबारामध्ये त्यांच्या तक्रारी अडीअडचणी सोडविणे याबाबत जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

(४) पोलीस अधिकारी / कर्मचारी हे तणावमुक्त व निरोगी कार्यरत राहण्यासाठी आरोग्यविषयक तपासणी / शिबीर / कार्यशाळा/ योगा/ आरोग्यविषयक जागरुकता शिबीरांचे आयोजन करण्यात येते.

(५) पोलीस रुग्णालय / दवाखान्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

(६) कामाच्या ठिकाणी व्यायामशाळेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कामाचा ताण कमी व्हावा यादृष्टीने वेगवेगळया प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रम दिवाळी मेळावा, उमंग, स्वरतरंग यासारखे संगीतमय कार्यक्रम हळदीकुंकु समारंभ इत्यादी तसेच क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येते.

(७) पोलीस कल्याण निधीतून शासनाच्या धोरणानुसार सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

(८) पोलीस क्लब / जिमखाना, विश्रामगृह, वस्तीगृहे, उपहारगृहे सबसीडीअरी कॅन्टीन, वाचनालय, अभ्यासिका बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी पतसंस्था मर्यादित इत्यादीद्वारे कौटुंबिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**राज्यातील विविध माथाडी कामगार मंडळामध्ये**
**रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(९) * ७७७५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध माथाडी कामगार मंडळामध्ये कामगार आयुक्त, कामगार उपायुक्त, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे मागील ९ वर्षापासून भरण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध माथाडी कामगार मंडळातील कामगार आयुक्त, उपायुक्त, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची सद्य:स्थितीत संख्या किती आहे व रिक्त पदे किती आहेत,

(३) सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशतः खरे आहे.

(२) राज्यात एकूण ३६ माथाडी मंडळे असून माथाडी मंडळांवर अध्यक्ष पदासाठी कामगार आयुक्तांच्या अधिपत्याखालील 'कामगार उपायुक्त' संवर्गातील ४ तर 'सहायक कामगार आयुक्त' संवर्गातील १ अशी ५ पदे मंजूर असून त्यापैकी २ पदे भरण्यात आली असून ३ पदे रिक्त आहेत. तसेच सचिव पदासाठी 'सरकारी कामगार अधिकारी' संवर्गातील १५ पदे मंजूर असून त्यापैकी २ पदे भरण्यात आली असून १३ पदे रिक्त आहेत. तसेच उर्वरीत सर्व मंडळांमधील अध्यक्ष व सचिव पदांचा अतिरिक्त कार्यभार कामगार आयुक्तांच्या अधिपत्त्याखालील इतर अधिका-यांना देण्यात आलेला आहे.

या शिवाय राज्यातील ३६ माथाडी मंडळांवर अध्यक्ष व सचिव या पदांव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांची एकूण ५०४ पदे मंजूर असून त्यापैकी ३४८ पदे कार्यरत आहेत व १५६ पदे रिक्त आहेत.

(३) मंडळांवरील अध्यक्ष व सचिव पदावर भरावयाच्या सहायक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे १८ व १७ मिळून एकूण ३५ पदांबाबतचा प्रस्ताव कामगार आयुक्त यांनी शासनास दिनांक ९/७/२०१४ रोजी सादर केला असून सदर प्रस्तावानुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याविषयी कामगार आयुक्त यांना दिनांक ६/५/२०१५ व दिनांक २५/६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे माथाडी मंडळांतील कर्मचा-यांची रिक्त पदे विहित कार्यपद्धती अवलंबून भरण्याबाबत शासनाच्या दिनांक ३/१०/२०१२ व दिनांक ४/१०/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यासाठी मंडळांमधील कर्मचा-यांकरीता सेवाप्रवेश नियमावली तयार करण्याची कार्यवाही ही कामगार आयुक्तांकडून सुरू आहे.

दरम्यान माथाडी मंडळांनी सदरहू रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याविषयी सर्व मंडळांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात विविध मोबाईल कंपन्यांनी नियम डावलून खोदकाम केल्याबाबत

**(१०) * ८१७२ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने पुणे शहरात विविध मोबाईल कंपन्यांना खोदकाम करण्याची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आली आहे,

(३) तसेच, मोबाईल कंपन्यांना राज्य सरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडून खोदकाम परवानगी घेऊन इंटरनेट सुविधा पुरविण्याबाबतचा करार करावा लागत असूनही असा कोणताही करार व आराखडा झालेला नसतांना पालिका आयुक्तांकडून परस्पर खोदकामासाठी परवानगी दिल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग १, २ व ३ प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नियम डावलून खोदकाम करणाऱ्या मोबाईल कंपन्यांवर तसेच नियमबाह्य खोदकामांस परवानगी देणाऱ्या संबंधीतांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) पुणे महानगरपालिकेमार्फत विविध मोबाईल कंपन्याना एकूण २८ अटी व शर्तीनुसार परवानगी दिली जात असून, त्यापैकी प्रमुख अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१. प्रत्यक्ष खोदाई सुरु करण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली जागेची संयुक्त पाहणी करणे.

२. खोदाई करणाऱ्या कंपनी/ठेकेदाराची विस्तृत माहिती व महानगरपालिकेच्या संबंधित अभियंत्याचे नाव, दूरध्वनी क्र. व काम सुरु केल्याचा व पूर्ण होण्याचा दिनांक असलेला फलक कार्यस्थळी लावणे आवश्यक आहे.

३. खोदाई करण्यासाठी महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांची तसेच वाहतूक पोलिसांची परवानगी घेणे.

४. कार्यादेश दिल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देवून, महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली खोदाई करणे.

५. खोदाई करताना रहदारी संबंधी आवश्यक ती दक्षता घेणे व आवश्यक ते संरक्षित कठडे उभे करणे.

६. खोदाई करताना रस्त्यावरील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.

७. खोदाई करताना भूमिगत सेवावाहिन्यांच्या नुकसानीची तसेच काही अपघात झाल्यास या कायदेशीर प्रक्रिया/दंडनीय आकारणेस/ खर्चास सर्वस्वी जबाबदारी कंपनी/ अर्जदार यांची राहील.

८. महानगरपालिकेकडून दिलेल्या मुदतीनंतर खोदाईचे काम चालू आढळल्यास ते त्वरीत बंद करणे.

(३) हे खरे नाही.

माहिती व तंत्रज्ञान विभागाशी झालेल्या करारानुसार व संबंधीत कंपनी/अर्जदार यांनी शासनाचे डीआयटी चार्जेस भरल्यानंतर महानगरपालिकेतर्फे नियमानुसार चार्जेस आकारुन परवानगी देण्यात येते.

(४) माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पूर्व परवानगीने महानगरपालिकेमार्फत परवानग्या दिल्या असल्याने, चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही**

**(११) * ७२०२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये महिलांसाठी अपुरी स्वच्छतागृहे असल्यामुळे महिलांची कुंचबणा होते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांवर महिलांसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन दयावीत व ती स्वच्छ ठेवावीत असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व पालिकांना दिले होते, तसेच याबाबत दिनांक ३१ मार्च २०१५ पर्यंत मुदत आखून दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार महिलांसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, ज्या पालिकांनी महिलांकरिता स्वच्छतागृहे उपलब्ध करुन दिली नाहीत त्या पालिकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे, राज्यातील शहरांमध्ये अपुरी स्वच्छतागृहे असल्यामुळे सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावरुन जाताना महिलांना स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करुन द्यावी व ती स्वच्छ ठेवावीत म्हणून “मिळून साऱ्याजनी” या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ९८/२०११ दाखल केली आहे.

महानगरपालिकांनी योजना तयार करुन दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यत प्रतिज्ञापत्राद्वारे मा. न्यायालयास सादर करण्याचे आदेश सदर जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दिले होते.

(२) अपुऱ्या स्वच्छतागृहांमुळे महिलांची होणारी कुचंबणा लक्षात घेवून महिलासांठी पुरेशी स्वच्छतागृहे प्राधान्याने बांधण्याबाबत शासनाने सर्व महानगरपालिकांना सूचना दिल्या आहेत. तसेच, स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत तरंगती लोकसंख्या असलेल्या सार्वजनिक ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालये उभारुन त्यामध्ये पुरुषांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधित महानगरपालिकांना शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

(३) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधित महानगरपालिकांना शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात झोपडपट्टी पुनर्विकास तातडीने व्हावा म्हणून अटीत बदल करुन कॉर्पस फंडही देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(१२) * ७९४५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झोपडपट्टी पुनर्विकास तातडीने व्हावा म्हणून अटीत बदल करण्याचा तसेच हजार कोटीचा कॉर्पस फंडही देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दिनांक १.१.२००० वा त्यापुर्वीच्या झोपडीच्या संदर्भात झोपडपट्टीवासियांची पात्रता निश्चित करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेले पुरावे कमी करणे तसेच, शपथपत्राच्या ऐवजी स्वयंघोषणापत्र देणे बंधनकारक करणे व इतर अटीत सुसुत्रता आणण्याच्या अनुषंगाने गृहनिर्माण विभागाने दिनांक १६.०५.२०१५ रोजीच्या शासन आदेशान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे नवीन गृहनिर्माण धोरणातील मसुद्यात प्रस्तावित करण्यात आले आहे. परंतु झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत हजार कोटीचा कॉर्पस फंड देण्याचा कोणताही निर्णय सद्यःस्थितीत घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई अग्निशमन दलातील जवान व अधिकारी यांना गणवेशासाठी देण्यात येणाऱ्या रकमेत झालेला गैरव्यवहार

**(१३) * ७६६१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलातील जवान व अधिकारी यांना गणवेशासाठी देण्यात येणा-या रकमेतील गैरव्यवहार प्रकरणी चौकशी होऊन कारवाई झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचा तपशील व स्वरुप काय,

(३) अग्निशमन दलातील कर्मचा-यांना मिळणा-या सुविधातील तफावत आणि सुरक्षा साधनांचा दर्जा व पुरवठ्यातील घोटाळ्यात शासनाने हस्तक्षेप करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अग्निशमन दलातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवठा केला जातो. अग्निशमन दलातील काही अधिकारी/कर्मचाऱ्यांनी गणवेशाऐवजी रोख रक्कम स्विकारल्यासंदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली.

सदर चौकशीमध्ये सक्षम अधिकाऱ्याने खालील आदेश पारीत केले आहेत :-

- ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी दोष कबुल केला त्यांच्याविरुध्द चौकशी न करता त्यांची एक वेतनवाढ दोन वर्षाच्या कालावधीकरीता बंद करण्याची शिक्षा ठोठावण्यात यावी.

सदर आदेशानुसार १३३७ अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर शिक्षादेश बजावण्याकरिता महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

- ज्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी गणवेशाची रक्कम घेतल्याचे नाकारले आहे किंवा कोणतेही उत्तर दिले नाही किंवा ज्या कर्मचाऱ्यांनी रोख रक्कम न घेता गणवेश स्वीकारल्याचे नमूद केले आहे त्यांच्याविरुध्द सर्वकष चौकशी सुरु करण्यासाठी दोषारोप पत्र बजावण्यात यावे.

सदर आदेशानुसार उर्वरित १०५१ कर्मचाऱ्यांविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

-----------------

## राज्यातील विविध भागात यंत्रमाग उद्योगातील कामगारांना किमान वेतन तसेच इतर सुविधा देणेबाबत

**(१४) * ७९१० श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागात यंत्रमाग उद्योगातील कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन बंधनकारक करणे, कामगारांना सुविधा देण्यासाठी कामगार कायदा लागू करणे, यंत्रमाग कामगारांना कारखानदारांकडून ओळखपत्र देणे, तसेच कामाचे ८ तास निश्चित करण्यात यावे इत्यादी मागण्यांबाबत कामगार संघटनांनी दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सोलापूर येथील यंत्रमाग कामगारांनी किमान वेतनाची मागणी शासनाकडे माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर येथील ४० हजार यंत्रमाग कामगार कृती समितीने दिनांक २ मे, २०१५ पासून किमान वेतन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बेमुदत संप सुरु केला असून जिल्हा यंत्रमागधारक संघटनेने किमान वेतन कायद्यास विरोध दर्शवून जवळपास ११ हजार रुपये किमान वेतन मिळाले पाहिजे असे कामगार कृती संघटनेची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा यंत्रभाग कामगार संघटनांनी सुधारित किमान वेतन अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २.५.२०१५ पासून कामबंद आंदोलन पुकारुन रुपये ११ हजार किमान वेतन मिळण्याची मागणी केलेली आहे. तथापि जिल्हा यंत्रमाग धारक संघटनेने सुधारित किमान वेतन अधिसूचनेस विरोध दर्शविला आहे.

(४) दिनांक २९.१.२०१५ रोजी शासनाने यंत्रमाग उद्योगातील कामगारांच्या किमान वेतन पुन:निर्धारणाची अधिसूचना निर्गमित केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्याच्या नावाखाली केलेली फसवणूक

**(१५) * ७६१६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्याच्या नावाखाली खुद्द मुख्यमंत्री यांच्या मंजूरीचे बोगस पत्र आणि चेकवर बोगस सही करुन फसवणूक करणाऱ्या श्री.दिलीप हरिचंद्र राजेशिर्के या मंत्रालयातील बडतर्फ कर्मचाऱ्यांला पोलिसांनी अटक केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारचे रॅकेट मध्ये मंत्रालयातील काही कर्मचारी कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर गुन्ह्यातील अटक आरोपी याने सदर गुन्ह्यातील इतर आरोपीतांविरुध्द कोणत्याही प्रकारची उपयुक्त माहिती सांगितली नसल्याने मंत्रालयातील कोणत्याही कर्मचारी यांच्याविरुध्द संशय व्यक्त करण्यात आलेला नाही.
(३) व (४) होय, प्रकरणी दिनांक १६.०४.२०१५ रोजी मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे येथे गुरक्र. ६०/२०१५ कलम ४२० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पोर्ट ट्रस्टच्या भूखंडावर केंद्र शासनाने राज्य शासनाला घरे बांधण्याची दिलेली मान्यता

**(१६) * ७८४३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीचा असलेल्या साडेतीनशे एकर भूखंडावर केंद्र शासनाने राज्य शासनाला घरे बांधण्याबाबत मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या भूखंडावर उभारावयाच्या भाडयाच्या तसेच परवडणाऱ्या घरांच्या योजनेला मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ५ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही घरे कोणकोणत्या प्रकारची बांधण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, या घरांच्या योजनेचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, तथापि, मुंबई पोर्ट ट्रस्ट हे केंद्र शासनाच्या अखत्यारितील विश्वस्त मंडळ असून, त्यांचे अभिलेख्यानुसार याबाबतचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील लकडगंज झोपडपट्टीवासीयांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत

**(१७) * ८२७२ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वर्धमाननगर टेलिफोन एक्सचेंजजवळ असलेली लकडगंज झोपडपट्टी ही गेल्या ४० ते ५० वर्षापासून असून त्याठिकाणी राहणाऱ्या अनेक लोकांजवळ आधार आणि निवडणूक ओळखपत्र असतांना त्यांची घरे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता तोडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत झोपडपट्टीधारकांनी अतिक्रमण विभागाला विनंती करुनही शेकडो झोपडया तोडल्याने तेथील नागरीक बेघर झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृध्द, लहान मुले तसेच आजारी माणसांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू झोपडपट्टीवासीयांसाठी शासनाने काय पर्यायी व्यवस्था केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, नागरी सुविधा केंद्रासाठी आरक्षित महापालिकेची जागा संरक्षीत करण्याच्या दृष्टीने , या जागेवरील अस्थायी अतिक्रमीत झोपडया काढण्याची कार्यवाही मनपा तर्फे वेळोवेळी करण्यात आलेली असुन, दिनांक २१/५/२०१५ रोजी अतिक्रमण निर्मलनाची शेवटची कार्यवाही केली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोकणात पर्यटन विकासासाठी सी.आर.झेडचे बंधन शिथील करण्याबाबत**

**(१८) * ६७१८ श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल तटकरे, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये पर्यटन विकासासाठी अनेक प्रेक्षणिय ठिकाणे असून त्या पर्यटन स्थळांचा विकास होण्यासाठी सी.आर.झेड चे बंधन येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पाच जिल्ह्यांमध्ये पर्यटन स्थळांचा विकास होण्यासाठी सी.आर.झेड चे बंधन शिथिल करण्याचे शासनाने मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यटन विकासामध्ये सी.आर.झेड. चे बंधन असल्याने कोकणच्या पर्यटन विकासासाठी प्राप्त झालेला रु.२२० कोटींचा निधी पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सी.आर.झेड चे बंधन दूर करुन शासन हा निधी कोकणच्या पर्यटन विकासासाठी उपयोगात आणणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर बाब केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाच्या अधिकारातील आहे. सी.आर.झेड नियमाची अडचण येऊ नये यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अनुक्रमे दि.१२/८/२०१३, दि.१९/१२/२०१३, दि.१९/२/२०१४, दि. ६/६/२०१५ व दि.१६/६/२०१४ च्या पत्रान्वये केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे सी.आर.झेड नियम शिथिल करण्याची विनंती केलेली आहे. तसेच केंद्रीय मंत्रालय (पर्यावरण, वने व वातावरणीय बदल) यांनी सी.आर.झेड अध्यादेश २०११ शी संबंधीत विषयाबाबत आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली असून या समितीची बैठक झाली आहे.

सदर बैठकीत महामंडळामार्फत सी.आर.झेड विषयक बाबींचे सादरीकरण केले व राज्याच्या पर्यटन विभागाशी संबंधीत सी.आर.झेड च्या अटील शिथिल करण्याची विनंती समितीस केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तासगांव-सांगली रस्त्यावर कवठेएकंद येथील ईगल फायर वर्क्स या शोभेची दारु तयार करणाऱ्या कारखान्यास लागलेली आग**

**(१९) * ६७२० डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव-सांगली रस्त्यावर कवठेएकंद येथील ईगल फायर वर्क्स या शोभेची दारु तयार करणाऱ्या कारखान्यास आग लागून दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास भीषण स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटात कारखान्यात काम करणाऱ्या आठ जणांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शक्तीशाली स्फोटात दोन इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार, शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदर स्फोटात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर स्फोटात ११ जणांचा मृत्यू झाला आणि ३ जण जखमी झाले, अशी वस्तुस्थिती आहे.

(३) सदर स्फोटात दोन शेड जमीनदोस्त झालेल्या आहेत, हे खरे आहे.

(४) होय, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे.

कारखान्यामध्ये शोभेची दारु (उदा. हवेत उडणारे फटाके बनविण्याचे काम चालू असताना चुकीने लोखंडी वस्तू जमिनीवर पडून ठिणगी उडून लागलेल्या आगीमुळे स्फोट झाला. त्यावेळी शेडमध्ये काम करीत असणाऱ्या ७ जणांचा जागीच मृत्यू झाला. तसेच शेडजवळ उभा असलेला एक खरेदीदार व अन्य तिघे गंभीर जखमी झाले, वैद्यकिय उपचारादरम्यान त्या चार जणांचा मृत्यू झाला, असे आढळून आले,

चौकशीत असेही आढळून आले की, सदर कारखान्यात मंजूर साठवणूक क्षमतेपेक्षा अवैधपणे अधिक स्फोटकांचा साठा करण्यात आला होता. तसेच एका शेडमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कामगार काम करीत होते. कारखान्याचे नकाशे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून मंजूर न करता कारखान्यामध्ये उत्पादनाचे काम सुरु होते. त्यामुळे भोगवटादाराविरुध्द विविध कायद्यांतर्गत संबंधित शासन यंत्रणेमार्फत कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात झालेल्या अनियमिततेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

१. जिल्हादंडाधिकारी , सांगली यांनी सदर घटनेची उपविभागीय दंडाधिकारी, मिरज यांना दंडाधिकारीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच जिल्हादंडाधिकारी, सांगली यांचेकडून स्फोटके निर्मितीसाठी देण्यात आलेला परवाना रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, तासगांव विभाग, तासगांव, यांचेमार्फत भारतीय दंडविधानांतर्गत कारवाई करण्यात आली असून सदर प्रकरणी भोगवटादारास अटक करण्यात आली आहे.

३. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ आणि कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतूदींच्या भंगाबाबत मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली यांच्या न्यायालयात एकूण ४ फौजदारी खटले दाखल केले आहेत.

(५) स्फोटामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मा. आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई कामगार न्यायालय सांगली, यांच्याकडे प्रकरण सादर करण्यात आले असून त्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

-----------------

## राज्यात नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही

**(२०) * ७१३६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन नक्षलवाद्यांच्या गोळीला गोळीनेच उत्तर देऊ असे सांगत असले तरी राज्य शासन करीत असलेले नक्षलवादयांविरोधातील प्रयत्न तोकडे पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मागील १५ वर्षात पोलीसांनी केवळ ६८ नक्षलवाद्यांना ठार केले असुन प्रत्यक्षात नक्षलवादी, माओवादी यांनी १२१ पोलीसांची हत्या केली असून १७३ जणांना पोलीसांचे खबरे समजून ठार मारले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) मागील १५ वर्षात सन २००० ते ३०/६/२०१५ पर्यंत नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात १५९ पोलीस जवान शहीद झालेले आहेत. या कालावधीत पोलीसांचे खबरे समजून २२४ नागरिकांना नक्षलवाद्यांनी ठार केले असून, ११३ नक्षलवाद्यांना ठार करण्यात पोलीसांना यश आले आहे.

(३) नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत -

१) शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉपटर उपलब्ध करुन दिले आहेत. २) जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते. तसेच एरिया डॉमिनेशन कार्यवाही करून नागरीकांना सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे. ३) जिल्हयात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युद्धप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडीव-हे (जि.नाशिक) येथे दरोडेखोरांनी ५८ किलो सोन्याची केलेली लुट**

**(२१) * ८१०० डॉ.अपूर्व हिरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडीव-हे (जि.नाशिक) येथे दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास ५८ किलो सोने दरोडेखोरांनी लुटून नेल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तीन संशयीतांना ताब्यात घेतल्यानंतरही मुख्य आरोपी पकडण्यास पोलीसांना यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद कंपनीच्या ५८ किलो सोन्याच्या विटा दरोडा टाकून चोरुन नेल्याबाबत वाडीवऱ्हे पोलीस ठाणे जि. नाशिक येथे गु.र.नं. ४०/२०१५ भा.द.वि कलम ३९५,३४२,१७०,१२० ब, आर्म ॲक्ट ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) व (३) होय.

दाखल गुन्ह्याच्या तपासात नमूद कंपनीच्या आरोपी सुरक्षा रक्षकांनी गुन्ह्यातील मुख्य आरोपी यांचेशी संगनमत करुन गुन्ह्याच्या कट रचला व दि. २४/०४/२०१५ रोजी नमूद कंपनीचे सोने घेवून जाणाऱ्या वाहनाचा व त्यातील इसमाबाबत परिपूर्ण महिती मुख्य आरोपींना दिली. त्यानुसार मुख्य आरोपींनी सदर वाहनाचा पाठलाग करत सदरचे वाहन वाडीवऱ्हे शिवारात अडवून वाहनाचे चालक, फिर्यादी व साक्षिदार रक्षक यांना रिव्हॉल्वरचा धाक दाखवून त्यांचे हातपाय बांधून प्रत्येक १ किलो वजनाच्या ६० सोन्याच्या विटापैकी ५८ विटा दरोडा टाकून चोरुन नेल्या. गुन्ह्यातील ५ आरोपीपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्यातील इतर आरोपींना अटक करणे व चोरी गेलेला माल हस्तगत करणेवर पोलीस तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यात सुरु असलेला स्थानिक संस्था कर रद्द करण्याच्या मागणीबाबत**

**(२२) * ७०४४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.महादेव जानकर, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरु असलेला एल.बी.टी कर दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून रद्द करणार असल्याची घोषणा शासनाने केल्यामुळे व्यापारी एलबीटी भरण्यास टाळाटाळ करित असल्याने राज्यातील महानगरपालिकांच्या उत्पन्नावर विपरित परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे महानगर पालिकांतर्फे होत असलेली विकासकामे ठप्प झाली असून काही महानगरपालिकांना त्यांच्या कर्मचा-यांचे पगार देण्यासही अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात स्थानिक संस्था कर (एल.बी.टी) न भरणा-या थकबाकीदार व्यापा-यांसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) तसेच, दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून एलबीटी ऐवजी व्हॅटवर सरचार्ज आकारण्याचा निर्णय माहे मार्च, २०१५ मध्ये घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू निर्णयामुळे महानगरपालिका व नगरपालिकाना मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे त्यामुळे शासनाने त्यांना अनुदान देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच, ५५ टक्क्यांपेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला व्हॅटवरील नाहक सरचार्ज भरावा लागणार असल्याने त्यांचे मोठ्याप्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे आहे, तरी ग्रामीण भागात व्हॅटवरील सरचार्ज आकारण्यात येऊ नये यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) अद्याप उपरोक्त सर्व बाबींवर कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) (अ) शासनाने दिनांक ३ जून, २०१५ पासून स्थानिक संस्था कराच्या थकीत रकमा वसुल करण्यासाठी अभय योजना लागू केली आहे.

(ब) या योजनेमध्ये व्यापाऱ्यांने अभय योजना कालावधीमध्ये थकीत कराचा भरणा केल्यास त्यास व्याज व दंड माफ करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

(४) मा.वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून एल.बी.टी बंद करण्याची घोषणा केली आहे व त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तथापि, व्हॅटवर सरचार्ज लावणेबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

(५) स्थानिक संस्था कर रद्द केल्यानंतर महानगरपालिकांचे सद्य ऐवढे किमान उत्पन्न प्राप्त होईल अशी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) स्थानिक संस्था कर रद्द केल्यानंतर महानगरपालिकांचे होणारे आर्थिक नुकसान भरुन काढत असतांना, ग्रामीण भागातील जनतेवर त्याचा आर्थिक भार पडणार नाही अशारितीने पर्यायी कर व्यवस्था निर्माण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाकड रोड (जि.पुणे) येथे वडापाव विक्री व्यवसाय करणाऱ्या विधवा महिलेला भर रस्त्यात जिवंत जाळण्याचा झालेला प्रयत्न**

**(२३) * ६६७७ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पतीच्या निधनानंतर वडापाव विक्री व्यवसाय करणाऱ्या विधवा महिलेला भर रस्त्यात जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास वाकड रोड, पिंपरी, पुणे येथे घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेमध्ये तिची मुलगी भाजली असल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनेमध्ये सदरची महिला ६० टक्के भाजली असून प्रकृती गंभीर होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे सारख्या सुसंस्कृत शहरामध्ये महिलावरील अत्याचारांचे प्रमाण वाढले असून पोलीस प्रशासन कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आरोपींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) या घटनेमध्ये तिची मुलगी ८ टक्के भाजली होती.
(३) होय.
(४) नाही.
(५) या प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून वाकड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२३७/२०१५, भा.दं.वि.कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तद्नंतर सदर महिला मृत झाल्यामुळे भा.दं.वि.कलम ३०२ समाविष्ट करण्यात आले. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) येथील मुख्य रहदारीच्या रस्त्यावर अनधिकृत फेरीवाल्यांच्या वाढत्या अतिक्रमणाबाबत

**(२४) * ६८०२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) एस.टी. बस स्थानक ते गांधीचौक या मुख्य रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत फेरीवाल्यांचे अतिक्रमण वाढल्यामुळे एस.टी. वाहतूकीस व नागरीकांना अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमणामुळे बस चालकांनाही त्रास होत असल्यामुळे एसटी डेपो तर्फे जव्हार नगरपरिषदेला वेळोवेळी अतिक्रमण हटविण्याबाबत कळवूनही याकडे जव्हार नगरपरिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर अतिक्रमण तात्काळ हटविण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) प्रश्नाधिन अतिक्रमण हटविण्याबाबत एस.टी.डेपो जव्हार तर्फे नगर परिषदेस तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

जव्हार नगरपरिषदेने अतिक्रमण हटविण्याबाबत वेळोवेळी नियमीतपणे कार्यवाही केली आहे. यामुळे जव्हार नगरपरिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे खरे नाही.

(३) नगरपरिषद प्रशानाकडून वेळोवेळी कार्यवाही केली जात असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला शहरातील विस्थापित व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२५) * ८०२६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७६ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला शहरातील सि.स.नं.३८०७/३८०८ आणि ३९०७/३९०८ मधील १६६ विस्थापित व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विस्थापित व्यवसायीकांचे पुनर्वसन करण्यासाठी येवला नगरपरिषदेने पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विस्थापित व्यवसायीकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) व (४) उपलब्ध १६६ गाळयांचे प्रचलित पध्दतीनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत लिलावाने वितरण करणे बाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना दि. १३.०५.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

-----------------

**म्हाडाने सर्वसामान्यांसाठी घरे बांधण्याबाबत**

**(२६) * ७७४५ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वसामान्यांचे घरकुलांचे स्वप्न साकारण्यासाठी म्हाडा चार वर्षात अडीच लाख घरे बांधणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडा कोणकोणत्या शहरात किती घरे बांधणार आहेत,
(३) त्यापैकी कोणकोणत्या गटासाठी किती किंमतीची घरे बांधण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, ही योजना केव्हा अंमलात आणण्यात येईल ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) म्हाडातर्फे पुढील पाच वर्षात २०१९-२० पर्यंत विविध उत्पन्न गटांतर्गत जनतेसाठी १,०९,२९८ घरे बांधण्याचे नियोजित आहे.

या व्यतिरिक्त शासनाच्या झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, बीएसयुपी, आयएचएसडीपी, सर्वांसाठी घरे २०२२, महाराष्ट्र प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण व सिडको या विविध संस्थांद्वारे/योजनांद्वारे ५,४९,०९७ अशी एकूण ६,५८,३९५ घरकुलांचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

(२) २०१५-१६ ते २०१९-२० या वर्षात विविध योजनां अंतर्गत म्हाडामार्फत पुढील पाच वर्षात मंडळनिहाय प्रस्तावीत घरकुलांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **क्र.** | **मंडळ** | **विविध योजनांतर्गत म्हाडाकडून बांधण्यात येणाऱ्या घरांचा तपशील** |
|---|---|---|
| १ | मुंबई मंडळ | १५८९२ |
| २ | मुंबई मंडळ/गिरणी जमीन योजना | १०३९७ |
| ३ | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ | ३१६४ |
| ४ | कोकण मंडळ | १९७४८ |
| ५ | पुणे मंडळ | १६९९२ |
| ६ | नागपूर मंडळ | १४६९० |
| ७ | औरंगाबाद मंडळ | ३६९० |
| ८ | नाशिक मंडळ | १२०३३ |
| ९ | अमरावती मंडळ | १२६९२ |
| | **एकूण** | **१०९२९८** |

(३) याबाबत आजमितीस निश्चिती नसली तरी म्हाडामार्फत बांधण्यात येणाऱ्या एकूण घरांच्या ६०% घरे अत्यल्प उत्पन्न गट/अल्प उत्पन्न गटांसाठी बांधण्यात येतात. बांधण्यात येणाऱ्या घरांच्या किंमती म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार निश्चित केल्या जातील.

(४) सदर बांधकाम कार्यक्रम सन २०१९-२०२० पर्यंतच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबविण्यात येईल.

-----------------

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट असलेल्या तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रांत मोठया प्रमाणात अवैध गोदामांची कामे सुरु असल्याबाबत**

**(२७) * ६८८९ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २९८२ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत समाविष्ट असलेल्या तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रात मोठया प्रमाणात अवैध गोदामांची कामे सुरु असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी तालुक्यातील एम.एम.आर.डी.ए. भागात अवैध गोदामाचे जाळे पसरत असून काही गोदामधारकांनी मुंबई महापालिकेच्या जलवाहिन्यांजवळील व मनपाच्या जागेत बांधकाम केल्याने भविष्यात जलवाहिनीस धोका होण्याचा संभव निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अवैध बांधकामास ग्रामपंचायतीची परवानगी नसताना ग्रामपंचायतीच्या सर्व सुविधांचा लाभ घेतला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने भिवंडीच्या एम.एम.आर.डी.ए. भागातील अवैध बांधकाम करणाऱ्या व जलवाहिनीस धोका निर्माण करणाऱ्या अवैध बांधकामांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल काय,
(६) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) सदर भागात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विशेष नियोजन प्राधिकारी असून प्राधिकरणाचे क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांनी या भागात फिरुन माहिती मिळाल्यावरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये २३८ अनधिकृत बांधकामावर कारवाई केलेली आहे. त्यातील १६ गाळ्यांचे निष्कासन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले असून उर्वरित प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे. सदर गोदामांची बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादित केलेल्या जागेवर उभारण्यात आलेली नाहीत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माढा (जि. सोलापूर) पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कुर्डुवाडी पोलीस ठाण्याच्या इमारतीची झालेली दूरवस्था**

**(२८) * ७०१५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माढा (जि. सोलापूर) पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कुर्डुवाडी पोलीस ठाण्याच्या इमारतीची दूरवस्था झाली असल्याचे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या शहरीकरणामुळे गुन्हेगारीच्या प्रमाणात होणारी वाढ, कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, कामाचा ताण कर्मचाऱ्यांना भेडसावत असून याकडे गृह विभागाने लक्ष द्यावे अशी नागरिकांनी विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी इमारतीची दुरवस्था सुधारण्याबाबत तसेच सोयीसुविधांबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरात अग्निशमन केंद्राची तसेच कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत**

**(२९) * ६९२० श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराचा २४३ चौ.कि.मी.चा विस्तार आणि वाढत्या लोकसंख्येसाठी अग्निशमन विभागाची यंत्रणा ही अपुरी असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०११ च्या जनगणनेचे निकष पाहता पहिल्या ३ लाखांसाठी १ आणि नंतर प्रत्येक एक लाख नागरिकांमागे एक अशा २६ ते २७ अग्निशमन केंद्राची शहरात गरज असून अडीच हजार अग्निशमन कर्मचारी आवश्यक असताना प्रत्यक्षात ५५० कर्मचारी शहराची सुरक्षा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत ५५० कर्मचाऱ्यांवर ४५ लाख नागरिकांची जबाबदारी असल्यामुळे सदरील यंत्रणा अपूरी पडत आहे, त्यामुळे कर्मचारी संख्येत वाढ करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहराचा विस्तार आणि लोकसंख्येच्या प्रमाणात पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाची यंत्रणा अपुरी आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) पुणे शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळानुसार एकूण ३५ अग्निशमन केंद्रे आवश्यक आहेत.

पुणे महानरपालिकेच्या अग्निशमन केंद्राची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

- ११ अग्निशमन केंद्रे कार्यान्वित आहेत.
- २ अग्निशमन केंद्रे, येत्या २ महिन्यांमध्ये कार्यान्वित होणार आहे.
- अन्य १ अग्निशमन केंद्र येत्या ६ महिन्यात कार्यान्वित करण्याची तजविज आहे.
- उर्वरित २१ अग्निशमन केंद्रे पुढील ७ वर्षामध्ये प्रतिवर्षी ३ या प्रमाणे विकसित करण्याचे पुणे महानगरपालिकेने नियोजन केले आहे.

पुणे शहराच्या नविन हद्दवाढीच्या सन २०१२ च्या विकास आराखडयानुसार अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

अग्निशमन केंद्रासाठी मंजूर असलेल्या ५७५ पदांपैकी ४७२ पदे कार्यरत असून, १०३ पदे रिक्त आहेत. दिनांक ६.८.२०१४ अन्वये नव्याने ३३५ पदे मंजूर केली असून, एकूण ४३८ रिक्त पदांची भरती प्रक्रिया पुणे महानगरपालिकेकडून सुरु आहे.

तसेच नव्याने अग्निशमन केंद्र सुरु करताना आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड औद्योगिक वसाहतीमधील ॲस्टेक लाईफ सायन्स कारखान्यातून झालेली वायुगळती**

**(३०) * ७१०७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील ॲस्टेक लाईफ सायन्स कारखान्यातून दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या वायुगळतीमुळे ९ महिला कर्मचाऱ्यांना त्याची बाधा होऊन एमएमए रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या मोठया प्रमाणावर वायुगळती होऊनही त्याप्रकरणी अद्यापही पोलीसांकडून कारखाना व्यवस्थापनावर वा कारखाना निरिक्षकांवर कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या वायुगळतीसंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मे. अॅस्टेक लाईफ सायन्स लि. या कारखान्यात दिनांक ०५.०४.२०१५ रोजी सकाळी ११.४५ वाजताच्या सुमारास वायुगळतीमुळे ८ महिला कामगारांना त्रास झाल्यामुळे एमएमए रुग्णालय, महाड येथे प्रथमोपचार करुन त्याच दिवशी घरी पाठविण्यात आले, अशी वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) सदर घटनेची चौकशी पोलीस विभाग, महाड एम.आय.डी.सी. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाड, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, रायगड यांनी केलेली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने चौकशीअंती दिनांक १०.०४.२०१५ रोजी कारखाना बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल केलेला आहे.

-----------------

**नागपूर मधील वाढत्या गुन्हेगारीस प्रतिबंध घालण्याबाबत**

**(३१) * ६९६२ श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे गुंडांचा हैदोस सुरु असुन त्यांना रोखण्यास पोलीस यंत्रणेला अपयश येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुर्ववैमनस्यातून २५ ते ३० गुंडाच्या टोळीने श्री.संतोष नावाच्या पुर्वी गुंड असलेल्या व्यक्तींवर हल्ला केला परंतु, तो पळून जाण्यात यशस्वी झाल्याने सदरहू गुंडांनी श्री.संतोष याच्या नागपूर शहरातील म्हाडा कॉलनीतील घरावर तसेच या टोळीने टेकानाका परिसरातील आवळे नगरात श्री.गुलाब अटराहे यांच्या घरावर हल्ला केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर येथील ढासळत्या कायदा व सुव्यवस्थेमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे,हे पाहता शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) होय.

या प्रकरणी पोलीस स्टेशन जरीपटका येथे गु.र.क्र.३२८/१५, भा.दं.वि.कलम १४३, १४७, १४९, ४२७, ४५२, ५०६, १२० (ब) भारतीय हत्यार कायदा सहकलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दहा आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत घडणा-या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गस्त पथकांची वाढ करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिका-यांनी देखील गस्त घालावी व त्या दरम्यान हजर असलेल्या कर्मचा-यांना देखील वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. याबाबत पोलीस आयुक्त आणि पोलीस सह आयुक्त दररोज आढावा घेत आहेत.

एप्रिल, २०१४ पासून गुन्हेशाखेच्या नियंत्रणात ४० कर्मचा-यांचे विशेष पथक, शस्त्र, वॉकी-टॉकी, मोटार सायकलसह दिवस-रात्र दोन पाळीत गस्त लावण्यात येत आहे. सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हेशाखा नागपूर शहर येथून दररोज ३ जिप गाड्या ज्यामध्ये पोलीसांची (महिला पोलीससह) गस्त लावण्यात येत आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त हे महत्त्वाचे वेळी स्वतः गस्तीवरील पोलीस कर्मचा-यांची पाहणी करतात. तसेच नव्याने २३ पोलीस वाहने (पोलीस गस्तीपथक) लोकसदृश अशा महत्त्वाचे ठिकाणी नेमण्यात येऊन त्यांस नजिकचे संवेदनशील ठिकाणी गस्तीकरिता पाठविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) येथील कोर्ट रस्त्यांच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(३२) * ७२२५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील कोर्ट रस्त्याचे सुरु असलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात येऊन या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत नागरीकांनी संबंधितांकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कारवाई तसेच रस्त्याचे काम दर्जेदार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. अशा स्वरुपाचा एक तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झालेला आहे.

(२) होय.

(३) संबंधित कामांच्या गुणवत्तेच्या दर्जाची तपासणी करण्याकरीता प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांना दि. २६.०६.२०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आदेशीत केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे आंबिवली येथील मे.नेपच्युन डेव्हलपर्स यांच्या प्रकल्पामधील रस्ते आरक्षण व सुविधा क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत न केल्याबाबत**

**(३३) * ६७५९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अखत्यारितील मौजे आंबिवली येथील मे.नेपच्युन डेव्हलपर्स यांच्या प्रकल्पामधील रस्ते आरक्षण व सुविधा क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत केलेले नसतांनाही विकासकास महानगरपालिकेने रेखांकन मंजूरी ३२०-१५३ दिनांक २८ जुलै, २०१० अन्वये देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण भूखंडाचे एकत्रित क्षेत्र/बांधकाम मंजूरीचे क्षेत्र ७४९८०.८८ चौ.मी. क्षेत्राचे बांधकामास परवानगी देण्यात आली असून या इमारतींना अद्यापी पूर्णतेचा दाखला प्रदान करण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.आयुक्त यांनी दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत विकासकास सुविधा क्षेत्र व विकास योजनेतील रस्त्याची जागा महापालिकेस हस्तांतरीत करणेबाबत विकासकास दिनांक २४ एप्रिल, २०१२ जा.क्र. कडोंमपा/नरवि/२२ अन्वये कळविण्यात आलेले असतांनाही अद्यापी सुविधाक्षेत्र व आरक्षणाची जागा विकासकाने महापालिकेस हस्तांतरीत केलेली नाही तसेच विकास योजनेतील रस्त्यांची जागा देखील हस्तांतरित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे आंबिवली येथे श्री.विष्णू पांडू भोईर व इतर यांचे कु.मु.प.धा.श्री.सचिन देशमुख (मे.नेपच्युन डेव्हलपर्स लि.) यांचे नांवे दिनांक २८/७/२०१० रोजी रेखांकन मंजूरी प्रदान करण्यांत आलेली आहे. या आदेशात विकासकाने सुविधा क्षेत्र, विकास योजना रस्ते व आरक्षणे महापालिकेस हस्तांतरीत करणेबाबत अट अंतर्भूत आहे. तसेच विकासकाने विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणेसाठी दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत केलेले बंधपत्र महापालिकेस सादर केलेले आहे.

(२) प्रस्तावाखालील भुखंडावर कल्याण-डोंबिवली महापालिकेने दिनांक २८/७/२०१० रोजी रेखांकन मंजूरी व तद्नंतर दिनांक ८/८/२०१४ पर्यंत वेळोवेळी रेखांकन मंजूरीमधील इमारतींना बांधकाम मंजूरी प्रदान केल्या आहेत. प्रस्तावातील भुखंडाचे एकूण क्षेत्र ११२०२९.०० चौ.मी.आहे. विकासकाने अद्यापपर्यंत बांधकाम पुर्णतेच्या दाखल्यासाठी प्रस्ताव सादर केलेला नसल्याने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला महानगरपालिकेकडून प्रदान करण्यात आलेला नाही.

(३) रेखांकनातील सुविधा क्षेत्र, विकास योजना रस्ते व आरक्षणे महापालिकेस हस्तांतरीत करणे संदर्भात आयुक्त, यांचे दालनात दिनांक १२/४/२०१२ रोजी बैठक झाली असून दिनांक २४/४/२०१२ रोजीचे पत्रांन्वये विकासकास विकास योजना रस्ते, आरक्षणे व सुविधा क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणेबाबत कळविण्यांत आलेले आहे. विकासकाने विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणेसाठी दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत केलेले बंधपत्र महापालिकेस सादर केलेले आहे. दिनांक १९/१/२०१५ व दिनांक ३/२/२०१५ रोजी विकासकाने रेखांकनातील विकास योजना आरक्षणे व सुविधा क्षेत्राचा स्थान बदलाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव अद्याप महानगरपालिकेने मान्य केलेला नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला प्रदान करण्यापुर्वी सुविधा क्षेत्र व आरक्षणाखालील क्षेत्र हस्तांतरीत करुन घेण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(४), (५) व (६) लागू नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेत शिक्षणाधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याबाबत

**(३४) * ७५५८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेतील शिक्षणाधिकारी हे पद मागील १० महिन्यांपासून रिक्त असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेअंतर्गत एकूण १३२ शाळा असून त्यामधील शिक्षकांची संख्या १ हजार ४५ इतकी असल्याने पुर्णवेळ शिक्षणाधिकाऱ्यांअभावी तेथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड होत असून शिक्षण व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्या निर्माण होत असल्याचेही त्याचसुमारास (माहे एप्रिल, २०१५) निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार गटविकास अधिकारी (श्री.बेलदार) यांचेकडे देण्यात आला आहे, तथापि श्री.बेलदार, गटविकास अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे महानगरपालिकेला पूर्णवेळ शिक्षणाधिकारी नियुक्त करण्याबाबत ठाणे महापगरपालिका प्रशासनाने मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना गेल्या १० महिन्यांपासून अनेकदा पत्राद्वारे व प्रत्यक्ष संपर्क साधून अनेकदा मागणी करुनही त्याबाबत अद्याप काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ठाणे महानगरपालिकेकरिता पुर्णवेळ शिक्षणाधिकारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील शिक्षणाधिकारी हे प्रतिनियुक्तीचे पद आहे.

सद्यस्थितीत शासनाकडून प्रतिनियुक्तींवर आलेले वर्ग-२ चे लेखाधिकारी यांचेकडे कार्यभार देणेत आला आहे त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्या निर्माण झालेल्या नाहीत.
(३) होय.
(४) व (५) ठाणे महानगरपालिकेने दिनांक ३०.०६.२०१५ अन्वये प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांना लिहिले असून ठाणे महानगरपालिकेमध्ये शिक्षणाधिकारी वर्ग-१ हे पद भरण्याबाबत विनंती केली आहे.

-----------------

**कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरास मुबलक पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(३५) * ७०७७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरात मागील काही महिन्यांपासून पाणीटंचाई असून महापालिकेतर्फे सकाळी केवळ दीड तासच मंदिरात पाणीपुरवठा केला जातो. यावेळेत मंदिरातील पाच हजार लिटर क्षमतेच्या चार टाक्या भरत नसल्यामुळे दिवसभर भाविक- पर्यटक यांना पाणी मिळत नसल्याने मंदीरातील अपुऱ्या पाणी पुरवठयाबाबत देवस्थान व्यवस्थापनाकडून महापालिकेला विनंती करुनही अद्याप दखल घेतली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे येणारे भाविक व पर्यटकांना पुरेसे व स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. महानगरपालिकेमार्फत अंबाबाई मंदिराला पाणीपुरवठा करण्यात येतो. तथापि, सदरचा भाग इतर भागाच्या तुलनेने उंचावर असल्यामुळे मंदिराला कमी दाबाने पाणी मिळते. तसेच मंदिर व्यवस्थापनाच्या मागणीनुसार महानगरपालिकेकडून उपलब्ध टँकरद्वारे मंदिराला पाणीपुरवठा करण्यात येतो.

(२) मंदिराला पुरेसा व नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी ५०० मिटर लांबीची केवळ मंदिरासाठी स्वतंत्र पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेला अंदाजे रु. १५.०० लक्ष रकमेच्या निधीची आवश्यकता असून निधी मंदिर व्यवस्थापनाकडून प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवडी न्हावा-शेवा हार्बर लिंकसाठी (एमटीएचएल) द्यावा लागणाऱ्या जमिनीचे बीपीटी आणि जेएनपीटी नव्याने मुल्यांकन करण्याबाबत**

**(३६) * ७७१२ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी न्हावा-शेवा हार्बर लिंकसाठी (एमटीएचएल) द्याव्या लागणाऱ्या जमिनीचे बीपीटी आणि जेएनपीटी नव्याने मुल्यांकन करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) मुंबई पारबंदर प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनीचे मुल्यांकन माफक दराने करण्याबाबत केंद्रीय बंदर विभाग यांना दि. १८ सप्टेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे विनंती केली होती. यानुसार मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी दि. ११ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई पारबंदर प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनीचे मुल्यांकन प्राधिकरणाला कळविले आहे. तद्नंतर २५ जून, २०१५ रोजी सचिव (बंदरे), केंद्र शासन यांचेबरोबर झालेल्या बैठकीमध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना बंदर नियमावली २०१४ च्या अधीन राहून प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमीनीच्या मुल्यांकनामध्ये महाराष्ट्र शासनास अधिक सवलत देता येईल किंवा कसे याची पडताळणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या अनुषंगाने मुंबई पोर्ट ट्रस्ट व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांमध्ये दि. १० जुलै, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. यामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्टतर्फे मुल्यांकनातील काही बाबींचा फेरविचार करावा असे ठरले. याबाबतची कार्यवाही मुंबई पोर्ट ट्रस्टकडून प्रगतीपथावर आहे.

-----------------

**डोंबिवली (जि.ठाणे) देसाई पुलाच्या परिसरात भरणी करुन कच्चा रस्ता तयार केल्याने सदर वस्तीत पावसाळ्यात पाणी घुसण्याचा निर्माण झालेला धोका**

**(३७) * ७१५७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील पश्चिमेकडील देसाई पुलाच्या भिवंडीकडील भागात सीआरझेड क्षेत्रात अनधिकृतपणे मोठया प्रमाणावर भरणी करुन कच्चा रस्ता बनविण्यात आला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाजे ७०० ते ८०० मीटरचा हा रस्ता देसाई खाडीत बनविण्यात आला असुन मागील अनेक महिने होत असलेल्या या भरणीप्रकरणी दोषींवर कारवाई होत नसल्याने या भरणीमुळे पावसाळयात भरतीच्या काळात नागरी वस्तीमध्ये पाणी घुसण्याचा धोका निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सबंधित दोषींवर कारवाई होण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अशी बाब जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या निदर्शनास आली आहे.

(२) व (३) या कच्च्या रस्त्यासाठी खाडीत करण्यात आलेल्या भरावामुळे पावसाळ्यात भरतीच्या काळात नागरी वस्तीमध्ये पाणी घुसण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाही.

मात्र, सद्यस्थितीत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत हा रस्ता पोलीस बंदोबस्तात बंद करुन वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून संबंधित दोषी व्यक्तींविरोधात दंडनीय नोटीस बजावण्यात आली असून, खाडीमध्ये भराव केल्याप्रकरणी पर्यावरण कायद्यानुसार संबंधित इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील लष्कराच्या हद्दीत असलेला दापोडी-बोपखेल हा रस्ता वाहतूकीस मोकळा करण्याबाबत

**(३८) * ७९८८ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सैन्य अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सी.एम.ई.) हद्दीतील दापोडी-बोपखेल रस्ता लष्कराने खुला करावा या मागणीसाठी दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बोपखेल येथील नागरिकांनी आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलन करणा-या जमावास पांगविण्यासाठी पोलीसांनी मोठया प्रमाणात लाठीमार करुन अश्रूधुरांच्या नळकांडया फोडल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न क्रमांक १ व २ प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार लष्कराच्या हद्दीत असलेला हा रस्ता वाहतूकीस मोकळा करण्याबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारशी चर्चा केली आहे काय,

(५) असल्यास, चर्चेचे निष्कर्ष काय आहेत,

(६) अद्याप कोणतीही चर्चा केली नसल्यास व नागरिकांना मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कारवाई न केल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बोपखेलगाव ते दापोडी हा बंद केलेला रस्ता पुन्हा सुरु करणेबाबत दिनांक २१ मे, २०१५ राजी अचानक ५०० ते १००० ग्रामस्थ बेकायदेशीररित्या जमले असता पोलीस पथकाने सदरचा जमाव हा बेकायदेशीर असुन लोकांनी येथून निघून जावे असे आवाहन केले. तथापि, सदरच्या जमावाने आवाहनास प्रतिसाद न देता पोलीसांवर अचानकपणे दगडफेक सुरु केली. त्यामुळे पोलीसांना बळाचा वापर करावा लागला.

(३), (४), (५) व (६) भोसरी पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत मौजे बोपखेल हे गांव येत असून याच परिसरातून दापोडी येथून मौजे बोपखेल येथे जाण्यासाठी पुर्वीपासुनचा २० फुटी डांबरी रस्त्याचे वापराबाबत बोपखेलचे ग्रामस्थ व सी.एम.ई. प्रशासन यांचेमध्ये गेले अनेक वर्षापासून वाद आहे.

सदर रस्ता दिनांक १२ मे, २०१५ रोजीपर्यंत ग्रामस्थांना वापरण्यासाठी खुला होता व सी.एम.ई. च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरचा रस्ता रात्रौ २३.०० वा ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत तसेच अधून मधून दिवसाही सी.एम.ई. प्रशासनामार्फत बंद ठेवण्यात येत होता.

याविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे ग्रामस्थांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. १०९१५/११ वर दिनांक २१ एप्रिल २०१५ रोजी न्यायालयाने सी.एम.ई. च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अंतरीम आदेश दिले आहेत.

वरीलप्रमाणे न्यायालयाने आदेश दिल्यामुळे सी.एम.ई. चे अधिकाऱ्याने दिनांक १२ मे, २०१५ रोजी भोसरी पोलीस ठाण्यात लेखी पत्र देऊन सदरचा रस्ता दिनांक १३ मे, २०१५ पासून बंद केलेला आहे.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**निजामपूर (ता.माणगाव, जि.रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्याने केलेला गैरव्यवहार**

**(३९) * ८३२३ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निजामपूर (ता.माणगाव, जि.रायगड) येथील सुरक्षा रक्षकाचा रखडलेला पगार देण्यासाठी तीन हजाराची लाच स्विकारताना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्याला दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत विभागाने अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्राचार्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी लोकसेवक प्राचार्य श्री.रामदास पुंडलीक पगारे यांनी तक्रारदार श्री.पविण प्रकाश सावंत, सुरक्षा रक्षक यांचा थकित पगार देण्यासाठी रुपये ३०००/- लाचेची मागणी करुन ती स्विकारले प्रकरणी त्यांना दिनांक २२/०४/२०१५ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याविरुद्ध माणगांव पो.स्टे.येथे गु.र.क्र.०४/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३ (२) अन्वये दिनांक २३/०४/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने प्राचार्य श्री.पगारे यांना दिनांक २३/०४/२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. सद्यःस्थिती मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

-----------------

**नाशिक रोड येथील मुक्तिधाम जवळची झोपडपट्टी गुंडांच्या मदतीने तोडल्याबाबत**

**(४०) * ७६४१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक रोड येथील मुक्तिधाम जवळची झोपडपट्टी शासन व महापालिका यांचा कुठलाही संबंध नसतांना गुंडाच्या मदतीने तोडण्यात आली तसेच अतिक्रमणाच्या नावाखाली एका राजकीय पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल केल्याने सदरील पक्षाच्या वतीने गोरगरीब दलित व अल्पसंख्यांक समाजावर होत असलेल्या अन्यायाविरोधात दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढून त्याबाबतचे निवेदन महसूल उपायुक्त सतिश देशमुख यांना दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली तसेच सदरील झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

सिंहस्थ कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व रहदारीस बाधा करणारे सर्व प्रकारचे शेड, ओटे, झोपडया व इतर अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत दि. ३०.१२.२०१४ रोजी स्थानिक वृत्तपत्रात महानगरपालिकेमार्फत पूर्वसूचना देण्यात आली होती.

तद्नंतर दि. ५.१.२०१५ पासून विविध भागातील अतिक्रमणे महानगरपालिकेमार्फत काढण्यात आली आहेत.

तसेच महानगरपालिकेमार्फत दि. १७.४.२०१५ रोजी मुंबई-आग्रा महामार्गाकडून राजीवनगर व इंदिरानगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाने बाधित होणारी अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत.

तद्नंतर अतिक्रमणाची मोहिम पुर्ण झाल्यानंतर तेथील स्थानिक रहिवाशी व त्यांचेसमवेत इतर नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी इंदिरानगर पोलीस स्टेशनवर मोर्चा काढून, बेकायदेशीर जमाव करुन कर्तव्यावर असलेल्या सरकारी नोकरांना कर्तव्यात अडथळा केल्याच्या कारणास्तव इंदिरानगर पोलीस स्टेशनमार्फत त्यांच्याविरुध्द इंदिरानगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतिक्रमण हटविण्याच्या पार्श्वभुमीवर संबंधितांनी महसूल उपायुक्त यांना दि. २०.५.२०१५ रोजी निवेदन दिले आहे.

(२) अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात आली असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे कामण (ता.वसई, जि.ठाणे) येथे जमिनीच्या वादातून झालेली मारहाण**

**(४१) * ८२०८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामण (ता.वसई, जि.ठाणे) येथील श्रीमती वना उर्फ वनिता विलास कोंढारी यांना त्यांच्या वडिलांच्या कै.राजची बराफ व त्याचे पती यांचे नावे असलेल्या जमिनीच्या वादातून १० ते १५ लोकांनी मारहाण केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री, गृहराज्यमंत्री तसेच उपविभागीय अधिकारी यांना दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर घटनेस जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, जमिनीचे वादातून सदरची घटना घडली आहे.

(२) श्रीमती वना ऊर्फ वनिता विलास कोढारी यांनी सदर घटनेच्या अनुषंगाने हल्ला करणारे लोकांच्या विरोधात अनुसूचीत जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार तसेच कलम भादंविसं कलम ३०७, ५०६ (२) प्रमाणे कारवाई करणेबाबतच्या विषयाचा अर्ज दिनांक २८.०४.२०१५ रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी, वसई विभाग यांचे कार्यालयात दिलेला आहे हे खरे आहे.

(३) व (४) होय, सदर प्रकरणी वालीव पोलीस स्टेशन गुरक्र. १३९/२०१५ भादंविसं कलम १४३, १४७, १४९, ३२६ प्रमाणे दिनांक १३.०४.२०१५ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

तथापि, अर्जदारांनी दि. २८.०४.२०१५ रोजी दिलेल्या निवेदनानुसार सदर गुन्ह्यात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३ (१), (१०), ३ (१), (११) हि कलमे वाढवून लावण्यात आलेली आहेत.

सदर गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सिग्नल तोडून जाणाऱ्या वाहनचालकांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत**

**(४२) * ८१३० श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेफिकीरपणे सिग्नल तोडून जाणाऱ्या वाहनचालकांकडून वाहतूक पोलीस दंड वसूल करीत असले तरी त्यांचेवर शिस्तभंगाची कोणतीच कडक कारवाई करीत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुक पोलीसांची संख्या अपुरी असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहतुक पोलीसांची पदे तातडीने भरण्यात येऊन वाहतुक नियंत्रणात आणण्याबाबत शासन कडक कारवाई करणार आहे काय,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मोटार वाहन कायदा, १९८८ कलम ११९/१७७ मधील तरतुदीनुसार वाहतूक सिग्लन तोडणाऱ्या वाहनचालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. याकरीता शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद मोटार वाहन कायद्यामध्ये नाही.

(२) होय, तथापि, राज्यात दि. ४.३.२०१४ च्या शासन निर्णयानुसार पोलीस आयुक्तालये व जिल्ह्यातील वाहतूक शाखांकरीता पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

(३) राज्याच्या महामार्ग विभागामध्ये २,३४९ पदे मंजूर असून १,३४८ पदे कार्यरत आहेत. उर्वरीत पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता भरती प्रक्रिया सुरु आहे.

मुंबई शहरातील वाहतूक शाखेमध्ये १०% अंमलदारांची वाढ करण्यात आली आहे. तसेच राज्यातील काही शहरांमध्ये वाहतूक पोलीसांची पदे पदभरतीच्या विविध टप्प्यांमध्ये उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील कंपन्यांनी केंद्रीय उत्पादन शुल्क बनावट चलनाद्वारे भरल्याबाबत

**(४३) * ९२३५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे कामगार पुरविणाऱ्या संघटना आणि कंपन्यांना केंद्रीय उत्पादन शुल्क भरणे आवश्यक असताना तीन फर्मच्या मालकांनी बनावट चलनाव्दारे ७० लाख रुपयास फसविल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे अंशत: खरे आहे.

५ फर्मच्या मालकांनी रु.६९,६०,९८६/- एवढ्या रकमेची फसवणूक केली असल्याचे आढळून आले आहे.

(२) व (३) केंद्रीय उत्पादन शुल्क, सीमा शुल्क आणि सेवा कर कार्यालयामार्फत प्रकरणाची चौकशी केली आहे. त्यानुसार ५ फर्मच्या मालकांनी त्यांचे साक्षीदार कर सल्लागार यांचेसोबत संगनमत करुन शासनाची फसवणूक करण्याचे उद्देशाने टिआर-६/जी.ए.आर. ७ मध्ये फेरबदल करुन खोटे व बनावट चलन तयार करुन सेवाकर ST-३ रिटर्न सोबत सादर केले. यातील आरोपींनी सदर ST-३ व बनावट चलनावर स्वाक्षरी करुन ST-३ रिटर्न व चलान खरे असल्याचे भासवून सेवाकराची रक्कम भरल्याबाबत खोटी माहिती सेवाकर विभागाकडे रिटर्न भरल्याबाबत खोटी माहिती सेवाकर विभागाकडे रिटर्न द्वारे सादर करुन सेवाकर विभागाची एकूण रु.६९,६०,९८६/- एवढ्या रकमेची फसवणूक केली आहे.

या प्रकरणी दि.०८/०५/२०१५ रोजी सहायक आयुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क, सीमा शुल्क आणि सेवा कर, औरंगाबाद यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन सिडको येथे ५ फर्म विरुध्द गु.र.नं.२१८/१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नारडा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील मुरली ॲग्रो सिमेंट कंपनीतील कामगारांना वेतन मिळत नसल्याबाबत**

**(४४) * ९७६० श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारडा येथील मुरली ॲग्रो सिमेंट कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना ४ महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याचे दिनांक २९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना त्याचे वेतन मिळण्यासंबंधी शासनाने सदर कंपनीवर कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कामगारांना थकीत वेतन मिळण्याबाबत केंद्र शासनाच्या सहाय्यक श्रम आयुक्त (केंद्रिय) चंद्रपूर यांनी कामगार संघटना व मुरली इंडस्ट्रीजच्या व्यवस्थापनास चर्चेकरीता वेळोवेळी पाचारण केले असून औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम ३३ (सी) (१) अन्वये व्यवस्थापनाकडून घेणे असलेल्या कामगारांच्या थकीत वेतनाबाबतचे विवरण कामगार संघटनेने सहाय्यक श्रम आयुक्त (केंद्रिय) चंद्रपूर यांच्याकडे सादर करण्याबाबत सांगितले आहे. जेणेकरुन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना वसूली प्रमाणपत्र पाठवून व्यवस्थापनाकडून थकीत असलेल्या कामगारांच्या वेतनाची रक्कम वसूल करता येईल.

-----------------

**कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील सिमेंटीकरणाच्या कामातील अनियमिततेबाबत**

**(४५) * ९९९९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिकाक्षेत्रात सुवर्णजयंती नगरोत्थान अभियांनातर्गत रस्ते सिमेंटीकरणाच्या कामात अनेक अनियमितता आढळून आल्या असून, या रस्त्यालगत कल्याण पूर्वेत अनेक ठिकाणी बांधलेल्या गटारी अतिक्रमणे न हटविता इमारतीखालून काढण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पूर्वेतील सूचक नाका ते श्रीराम टॉकीज या ३७७० मी. लांबीच्या रस्त्याचे काम चार वर्षापेक्षा अधिक काळ चालू असून अद्याप ते अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याच्या सिमेंटीकरणाचे काम शीघ्रगतीने हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे अशी मागणी तेथील नागरिकांकडून आयुक्त, कल्याण-डोंबिवली मनपा, मा. नगरविकास मंत्री, मा. पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांच्याकडे मागील दोन वर्षापासून सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याच्या सिमेंटीकरणाचे काम रेंगाळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) रस्ते कॉक्रीटीकरणाच्या कामात अनियमितता झाल्याचे आढळून आलेले नाही.

मात्र, कल्याण पुर्व येथील पुना लिंक रस्त्याच्या रुंदीकरणात बाधीत झालेली सुमारे १८०० वाणिज्य वापराची अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत. याखेरीज या रस्त्याच्या रुंदीकरणात २२ जुन्या बहुमजली इमारती देखील बाधीत होत आहेत. या इमारतींचे निष्कासन करण्यापूर्वी इमारतींमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. या कार्यवाहीस काही कालावधी लागणे अपेक्षित असल्याने तुर्त या इमारतींपैकी १९ इमारतीलगत पूर्वी असलेल्या गटारास नवीन गटार जोडण्यात आले आहे. तर उर्वरित ३ बहुमजली इमारतीखालून गटाराचे काम रहिवाशांच्या पूर्वसहमतीने पूर्ण करण्यात आले आहे.

(२) व (३) होय.

(४) रस्ते सिमेंटीकरणाच्या कामास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

- सदर रस्ता अत्यंत रहदारीचा असून वाहतूक शाखेकडून टप्प्या टप्प्याने काम करण्यास परवानगी मिळत असल्याने त्यावर दुहेरी वाहतूक सुरु ठेवून काम पूर्ण करण्यात येत आहे.
- विठ्ठलवाडी स्टेशनलगतच्या रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या झोपडयांची बांधकामे हटविण्यास मा. न्यायालयाची स्थगिती असल्याने या भागातील काम अद्याप अपुर्ण आहे.
- जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत नव्याने जलवाहिनी व मल:निस्सारण वाहिनी टाकण्याचे काम जसजसे पूर्ण होत गेले तसतसे कॉंक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे.
- महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ व भारत संचार निगम मर्यादित यांचे केबल

टाकण्याचे काम , महानगर गॅसचे भुमिगत पाईपलाईनचे काम तसेच विद्युत रोहित्र हटविणे इत्यादी कामे पूर्ण झाल्यानंतर कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागसेन शिक्षण संस्था (नागपूर) येथील पदाधिकाऱ्याने शिक्षण संस्थेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक**

**(४६) * १०३३३ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संस्थेच्या शाळेत नोकरी लावून देण्याप्रकरणी नागसेन शिक्षण संस्था, नागपूर येथील संस्थेचे पदाधिकारी श्री.रुपक जांभूळकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील श्री.घनशाम बोरकर यांचेकडून साडेसात लाख रुपये नगदी घेऊन नोकरी न दिल्याने श्री.रुपक जांभूळकर यांचेविरुध्द जरिपटका पोलीस स्टेशनमध्ये फिर्यादिने तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी नागसेन शिक्षण संस्था, नागपूर यांचे पदाधिकारी श्री.रुपक जांभूळकर यांनी श्री.बोरकर यांना नोकरी लावून देतो म्हणून त्यांच्याकडून रुपये ७,५०,०००/- घेतले व त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी पोलीस स्टेशन जरिपटका येथे गु.र.क्र.३४०/२०१५, भा.दं.वि.कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली होती. परंतु आरोपीने न्यायालयातून जामीन मिळविला आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(४७) * १०४७८ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर शहराची ३० वर्षानंतरची लोकसंख्या विचारात घेवून व त्या लोकसंख्येला मुबलक पाणी मिळावे म्हणून राबविल्या जात असलेल्या फेज-२ या नव्या पाणीपुरवठा योजनेचे काम बंद होऊन तीन आठवडे झाले तरी ते पुन्हा सुरु होण्याची चिन्हे अद्याप दिसत नसल्याचे माहे, एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तापी प्रिस्टेट कंपनीच्या झालेल्या कामांची बिले अदा करुन हे काम पुर्णत्वास नेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी या उपअभियानाअंतर्गत मंजूर अहमदनगर शहर पाणी पुरवठा प्रकल्प टप्पा क्र. ०२ चे काम ठेकेदाराने दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पासून बंद केले होते.
(२) तथापि ठेकेदारास देय असलेले देयक अहमदनगर महापालिकेमार्फत अदा करण्यात आले असून सद्य:स्थितीत योजनेचे काम चालू असून प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात बालकांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्या टोळीवर कारवाई करण्याबाबत**

**(४८) * ९३०३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बालकांच्या अवयवांची तस्करी करणारी टोळी सक्रिय असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार राज्यात बालकांच्या अवयवांची तस्करी होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पोलीस उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी कृषी अधिकाऱ्याच्या गैरप्रकारांची चौकशी दडपल्याने त्यांचेवर करावयाची कारवाई**

**(४९) * ७२७४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता.मानवत जि.परभणी येथील तालुका कृषि अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरप्रकारांची चौकशी करण्याऐवजी त्यांच्याच अहवालावरुन प्रकरण निकाली काढीत दोषींचा बचाव करण्याचा प्रकार पोलीस उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी केल्यावरुन त्यांच्याविरुध्द संबंधित शेतकऱ्याने पोलीस अधिक्षक, परभणी यांच्याकडे सन २०१४-१५ दरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या गैरप्रकार दडपण्याच्या व शेतकऱ्यांवर अन्याय करण्याच्या प्रकाराविरोधात स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी सन २०१५ मध्ये वा दरम्यान पोलीस महासंचालक यांच्याकडे सविस्तर तक्रार केली आहे काय,
(३) असल्यास, या तक्रार अर्जातील मुद्याप्रमाणे संबंधित पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या चौकशी दडपण्याच्या प्रकाराची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच संबंधित पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, मानवत तालुका कृषी कार्यालय, मानवत एकात्मीक पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाअंतर्गत दि. ०१/०४/२०१४ ते दि. ३०.०६.२०१४ या काळात झालेल्या ढाळीच्या बांधकामाचे मंजूर कामाचे देयक संबंधिक कृषी सहायक व इतर यांनी तयार न करता रक्कमा उचलल्याबाबतचे परभणी जिल्हा कॉंग्रेस कमिटी (आय) तालुका अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती विभाग, यांचे लेटर पॅडवर कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना लिहिलेले व पोलीस अधिक्षक, परभणी यांना प्रत अग्रेषित केलेले पत्र पोलीस अधीक्षक, परभणी यांना प्राप्त झाले आहे.
(२) अशा प्रकारची तक्रार पोलीस महासंचालक यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.
(३), (४) व (५) पोलीस अधीक्षक, परभणी यांना प्राप्त पत्राच्या अनुषंगाने, मौजे नरळद येथील पाणलोट क्षेत्राच्या कामामध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नसल्याचे तालुका कृषी अधिकारी, ता. मानवत जि. परभणी यांनी कळविले असल्याने सदर अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

-----------------

## मुंबईतील साकीनाका येथील पोलीसांनी पोलीस ठाण्यातच एका मॉडेलवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(५०) * ७३६१ श्री.विजय गिरकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील साकीनाका येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि तीन पोलीसांनी पोलीस स्थानकात एका मॉडेलवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिसांनी या महिलेकडून सोन्याचे दागिने काढून घेतले असून तिच्या मित्राकडूनही चार लाख रुपये घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मॉडेलवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

गुन्ह्यातील एकूण ९ आरोपीपैकी सहाय्यक पोलीस निरिक्षक, साकीनाका पोलीस ठाणे याने गुन्ह्यातील फीर्यादी हीला साकीनाका पोलीस ठाणे अंतर्गत संघर्षनगर पोलीस चौकीत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

(२) अंशतः खरे आहे.

संघर्षनगर चौकीत आरोपी महिला (खाजगी महिला) हिने फीर्यादी महिलेच्या पर्समधील रोख रुपये १८,०००/-, हातातील घड्याळ व सोन्याची अंगठी अशी एकूण रुपये ४,९८,०००/- किंमतीच्या मालमत्तेची चोरी केली. तसेच या गुन्ह्यातील फीर्यादी व साक्षिदार यांच्यावर कायदेशीर कारवाई न करण्याकरिता त्यांच्याकडून रुपये ४ लाख ३५ हजार इतकी रक्कम जुलमाने घेतल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) व (४) होय.

सदर प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुरक्र.००/१५ अन्वये गुन्हा नोंद करुन गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुअवि.मुंबई येथे गुरक्र.५६/१५, प्रमाणे भारतीय दंड विधान संहिता कलम १२० (ब), ३८४, ३८८, ३७९, ३७६(२)(अे)(I)(II)(III), ३६५, ३६६, ३५४(अ)(१), ३५४(अे)(२), १७०, ३४१, ३४२, ३४७, ३२३, ३२४, ३२७, ५०९, ५०६(२), २०१, २११, ४१४, ४३, ११४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, सदर प्रकरणी एकुण ९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपींपैकी ३ आरोपी हे शासकीय सेवक असून, त्यांना त्यांचे अटकेनंतर तात्काळ निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच ८ आरोपीच्या विरोधात दिनांक २२.६.२०१५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, त्याचा कोर्ट केस क्रमांक ४६२/पीडब्ल्यू/२०१५ प्रमाणे असून, सदरील खटला सत्र न्यायालय येथे वर्ग करण्यात आला १ आरोपीच्या विरोधात तपास चालू असून, त्याचे विरोधात पुरवणी दोषारोप पत्र दाखल करण्यात येत आहे. ९ पैकी ८ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत, १ आरोपी पोलीस कोठडीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांना अधिकार देण्याबाबत**

**(५१) * ७३९५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २९२५ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नगरपरिषद, १९६५ कायदा अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व २२७ नगरपरिषदांमधील नगराध्यक्षांचे अधिकार मागील काही वर्षात काढून घेण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधीच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत त्यामुळे अतिमहत्वाच्या कामांना परवानगी देतांना नगराध्यक्षांना सह्या करण्याचे अधिकार नसल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित राहिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्यातच काही ठिकाणी एकाच अधिकाऱ्यांकडे तीन-तीन नगरपरिषदेचा भार टाकण्यात आला असून तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामूळे त्याचा भार तहसिलदारांकडे टाकण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार उक्त पदे भरण्याबाबत तसेच नगराध्यक्षांना पूर्वीप्रमाणे अधिकार देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) होय, मुख्याधिकाऱ्याचे पद रिक्त होत असल्यास सदर पद भरेपर्यंत या पदाचा अतिरिक्त भार शक्यतो नजीकच्या मुख्याधिका-याकडे आणि काही कारणास्तव ते शक्य नसेल तर महसूल विभागाकडील सक्षम अधिका-याकडे देण्यात येतो.

(४) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५)

- रिक्त पदे विचारात घेऊन २३ परिविक्षाधीन मुख्याधिकाऱ्यांना दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून नियमित मुख्याधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.
- तसेच मुख्याधिकारी गट-ब या संवर्गासाठी १८५ पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे करण्यात आलेली आहे.
- नगराध्यक्षांना देण्यात आलेले कोणतेही अधिकार काढून घेतलेले नसल्याने पूर्वीप्रमाणे अधिकार देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण प्रकल्पांकरिता निधी उभारण्यामध्ये खाजगी विकासकांना अडचणी येत असल्याबाबत**

**(५२) * ७७९७ श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण प्रकल्पांकरिता निधी उभारण्यामध्ये खाजगी विकासकांना अडचणी येत असल्यामुळे त्यांना सरकारी जमिनी गहाण ठेवण्याचा अधिकाराबाबत निर्णय शासनाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे सरकारच्या एसआरए, सिडको, म्हाडा आणि प्राधिकरणांच्या अखत्यारीतील सर्वच जमिनी गहाण ठेवायला विकासकाना मुभा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, आतापर्यंत किती विकासकांनी बँकेकडे जमिनी गहाण ठेवल्या आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) ते (४) राज्याचे प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ चा प्रारुप मसुदा यशदातमार्फत तयार करण्यात आला असून त्यातील प्रकरण ५ मधील मुद्दा क्र. ५.३ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजना, म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास योजना व शासकीय जमिनीवरील शहरी नुतनीकरण प्रकल्प यांच्यासाठी निधी उपलब्ध करण्यामध्ये येणारा अडथळा दूर करण्यासाठी व प्रकल्प उभारणीसाठी निधी उपलब्ध करणे विकासकास शक्य व्हावे म्हणून ज्या प्रकल्पांना संबंधित प्राधिकरण मंजूरी प्रदान करील, अशा प्रकल्पांसाठी निधी उभारण्याकरिता जमीन गहाण ठेवण्यासाठी मान्यता देण्यांत येईल. सदर निधी केवळ त्याच जमिनीवर असलेल्या प्रकल्पासाठी वापरता येईल, असे प्रस्तावित करण्यांत आले आहे.

सदर प्रारुप मसुद्याच्या प्रती राज्यातील सर्व संसद सदस्य व विधानमंडळ सदस्य तसेच प्रशासकीय विभागाच्या सचिवांना सूचना व शिफारशीकरिता पाठविण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून सदर धोरणासंबंधी प्राप्त सूचना/अभिप्रायाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## कोंढाळी नगर (ता.काटोल, जि.नागपूर) ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत

**(५३) * ७३४५ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाळी नगर (ता.काटोल, जि.नागपूर) ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्यासंबंधी मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशाची अजूनही अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्यासाठी लागणा-या सर्व बाबी पुर्ण असूनही नगरपरिषदेचा दर्जा न देण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदरहू ग्रामपंचायतील नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झालेला नाही,

(३) जिल्हाधिकारी यांचेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर छाननी अंती योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील उत्तन येथील खोल समुद्रात मच्छिमार बोटीवरील खलाशांना ओ.एन.जी.सी.च्या सुरक्षा रक्षकांनी केलेली मारहाण

**(५४) * ६९९० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनिल तटकरे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील उत्तन येथील खोल समुद्रात ओएनजीसीच्या सुरक्षा रक्षकांनी मच्छिमार बोटीवरील खलाशांना मारहाण करुन गोळीबार केल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) याप्रकरणी चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, याबाबत चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी येलोगेट पोलीस ठाणे गुरक्र. १७/१५, कलम ३०७,३३६,३४ भादंवि सह कलम ३, २५ भाहका सह ३७ (अ) महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबईतील उड्डाणपुलावर ध्वनिरोधक बसविण्याचे काम निविदा न काढताच कंत्राटदारास दिल्याबाबत**

**(५५) * ७७५८ श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबईतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सायन हॉस्पिटल, किंग्ज सर्कल-तुळपुळे चौक आणि हिंदमाता उड्डाणपुल या विविध उड्डाणपुलासाठी ध्वनिरोधकांचे १८.९० कोटींचे काम कोणतीही निविदा न काढता जे कुमार या कंत्राटदारास दिले असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदारास यापूर्वी दहिसर रेल्वे ओलांडणी पुलावर ध्वनिरोधक बसविण्यासाठी त्यावेळी बाजारातील दर प्रतिमिटर रुपये ९५०० प्रतिसंवर्ग असतानाही रुपये १२,५०० प्रतिसंवर्ग या वाढीव दराने कोणतीही निविदा न काढताच कामाचे कंत्राट दिले असल्याचे व त्यामुळे रुपये ५.७४ कोटी इतक्या जादा रकमेचा शासनास भुर्दंड सोसावा लागला असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील अनेक नागरिकांनी यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुख्य सचिव (श्री.स्वाधिन क्षत्रिय) महाराष्ट्र शासन व प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांचेकडे निवेदन दिल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू तक्रार-निवेदनाच्या अनुषंगाने त्यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले तसेच संबंधित कंत्राटदार (जे.कुमार) यांना नियमबाह्यरित्या कंत्राट देण्याची विशेष कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहेत,

(५) तसेच सदर चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध तसेच संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्नाधिन बाबी संदर्भात माहे एप्रिल, २०१५ मध्ये नागरिकांकडून तक्रार प्राप्त झाली आहे. पुलावरील ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत दिनांक ०७.१२.२००९ रोजी देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारा उड्डाणपुलावर ध्वनीरोधक बसविण्याचे काम हाती घेतले. याकरीता केंद्रशासनाच्या अधिपत्याखालील केंद्रीय सडक अनुसंधान संस्था (CRRI) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली. या संस्थेने सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार ध्वनीरोधकाचे दर रुपये ११,०००/- (Mono Absorbing) ते रुपये १२,५००/- (Mixed Type) इतके आहेत. दहिसर पुलाच्या कामाकरीता दर रुपये १२,८००/- इतका आहे. ध्वनीरोधक हा उड्डाणपुलाचा घटक असल्याने तसेच पुल देखभाल कालावधीत असल्याने पुलाच्या कंत्राटदारास अतिरिक्त बाब म्हणून प्राधिकरण व कार्यकारी समिती यांच्या मंजूरीनंतर ध्वनीरोधक बसविण्याचे काम देण्यात आले आहे. या सर्व बाबीत विहित प्रक्रियेचे पालन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर करण्यात आले आहे.

-----------------

**पुणे शहरात राबविण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच्या कामाबाबत**

**(५६) * ८१६९ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकारी व निमसरकारी जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याचे योजनेत तरतूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तरतूदीनुसार पुणे शहरात एसआरए चे किती प्रकल्प मार्गी लावण्यात आले आहेत,

(३) तसेच, एसआरए च्या पूर्वीच्या नियमावलीत अनुक्रमे दुप्पट, अडीचपट व तिप्पट टीडीआर ची तरतूद अनुक्रमे ए.बी.सी.झोनसाठी होती, अंतिम नियमावलीत ती बदलून अनुक्रमे दिड, दोन व अडीच करण्यात आली तद्नंतर एसआरए ची पुणे शहरामध्ये एकही स्कीम दाखल झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुण्यामध्ये जुन्या नियमावली नुसार झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्यासाठी व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे नविन प्रकल्प मार्गी लागण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम, १९७१ अन्वये तसेच, संबंधीत शहरांसाठी नगर विकास विभागांकडून अधिसूचित होत असलेल्या नियमावलीनुसार संबंधित शहरात खाजगी, शासकीय व निमशासकीय मालकीच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येतात.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी - चिंचवड क्षेत्र कार्यालयामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे एकूण २०८ प्रस्ताव दाखल झालेले असून त्यापैकी ५१ जागेवरील प्रस्ताव शासकीय/निमशासकीय मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टयांच्या संदर्भात आहेत.
(३) शासन निर्णय, नगर विकास विभाग दि. ११.०९.२०१४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारित विशेष नियमावलीनंतर दोन झोपडपट्टी पुनर्वसन योजना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचपड क्षेत्र कार्यालयाकडे दाखल झालेल्या आहेत.
(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी - चिंचवड क्षेत्र कार्यालयासाठी सुधारित विशेष नियमावली प्रसिध्द करण्यात आली असल्याने जुन्या नियमावलीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाबाबत

**(५७) * ७२०४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील मेट्रो प्रकल्पाचा तिसरा टप्पा रखडलेला असताना एमएमआरडीए ने आता प्रस्तावित दुसरा व चौथा टप्पा राज्य सरकारकडे मंजूरीसाठी सादर केला असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मेट्रो प्रकल्पाचा तिसरा टप्पा तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाबाबत शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(४) तसेच, मुंबईतील दहिसर ते मानखुर्द हा मेट्रो रेल्वेचा दुसरा टप्पा व वडाळा ते कासारवडवली हा मेट्रोचा पाचवा टप्पा भूयारी ऐवजी उन्नत करण्यासंबंधीचा प्रस्ताव एमएमआरडीएने शासनाकडे सादर केला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मेट्रो रेल्वे मार्ग भुयारी ऐवजी उन्नत करण्याची कारणे काय आहेत, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) मुंबई मेट्रो लाईन-३ - कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मार्गिकेकरिता सर्वसाधारण सल्लागार म्हणून मेसर्स पेडेको-एइकॉम-लुईस बर्गर यांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांच्या मार्फत दिनांक २२ मे, २०१५ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. तसेच पूर्व अर्हता प्रक्रिया पूर्ण करुन स्थानके व बोगदा यांची स्थापत्य कामे करण्यासाठी ९ निविदाकारांची निवड सूची तयार करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ पर्यंत बांधकाम कंत्राटदाराची नेमणूक होणे अपेक्षित आहे.
(४) नाही.
(५) पुढील ३-४ वर्षात मेट्रो मार्गाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मेट्रो रेल्वे मार्ग उन्नत करण्याची बाब मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## पुणे महापालिकेने शहरात नागरिकांच्या सोईसाठी किऑस्क पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत

**(५८) * ७९५४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महापालिकेने सन २००६ पासून शहरात नागरिकांना वीज बिल, मिळकतकर, फोन बिल, रेल्वे व बसचे आरक्षण आदि सेवा सहज मिळण्यासाठी सुरू केलेले ७५ किऑस्क पैकी बहुतांश किऑस्क बंद असल्याचे व ते पूर्णक्षमतेने चालू नसल्याने भाडे रक्कमेपोटी पालिकेला आर्थिक भूर्दंड पडत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पूर्णपणे बंद असलेले किऑस्क पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेतर्फे शहराच्या विविध भागात नागरिकांच्या सोईसाठी ७५ किऑक्स केंद्रे उभारण्यात आली होती. तथापि, विविध विकास कामात जसे रस्ता रुंदीकरण, भुयारी मार्गाचे काम व रस्त्यांची विकासकामे इ. साठी अडथळा असणारी २० किऑक्स केंद्रे बंद करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत ५५ किऑक्स केंद्रे कार्यान्वित आहेत.

बंद असलेल्या २० किऑक्स केंद्राचे कोणतेही बिल ठेकेदारास अदा करण्यात येत नसल्यामुळे पुणे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडत नाही.

(२) व (३) किऑक्स केंद्राची पाहणी पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये झालेल्या मोठया बदलांमुळे सद्य:स्थितीत नागरीकांचा कल ऑनलाईन सुविधांचा वापर करण्याकडे वाढला असल्याने, किऑक्स केंद्राचा वापर दिवसेंदिवस कमी होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील गोरेगाव मधील म्हाडाच्या ४२ एकर जागेवरील पत्रा चाळीच्या पुनर्विकासात तुकडे पाडून या जागा परस्पर विकासकांना विकल्याबाबत**

**(५९) * ७६७८ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८५ ला दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाचे अकराशे कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे ऑडीट नोटमध्ये उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) मुंबई उपनगरातील गोरेगाव मधील म्हाडाच्या ४२ एकर जागेवरील पत्रा चाळीच्या पुनर्विकासात तुकडे पाडून या जागा परस्पर विकासकांना विकल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मुंबई उपनगरातील गोरेगाव मधील सिध्दार्थ नगर, सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हाडा व गुरु आशिष कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लि. यांच्यामध्ये दि. १०.४.२००८ रोजी पत्राचाळ या जुन्या म्हाडा वसाहतीच्या संयुक्त विकासाकरिता सुधारित त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला होता. त्यानुसार सदर वसाहतीच्या एकुण ४० एकर (१, ६१, ८७४ चौ.मी.) क्षेत्राचा एकत्रित पुनर्विकास करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्ष मोजणीमध्ये प्रकल्पाचे क्षेत्रफळ १,९३,५९९.९० चौ.मी. इतके वाढल्याने व त्यामुळे म्हाडाच्या हिश्श्याच्या क्षेत्रफळात वाढ होत असल्याने सुधारित त्रिपक्षीय निश्चिती व सुधारणा विलेख दि. ७.१०.२०११ रोजी करण्यात आलेला आहे. त्यानुसार म्हाडाच्या वाटयाला १,४८,१५१.०७ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध होणे अपेक्षित होते. सदर विलेखामधील कलम ४ मध्ये वाढीव क्षेत्रफळ विचारात घेऊन प्रकल्पाची वित्तिय व्यवहार्यता तपासून बांधकाम क्षेत्राच्या वाटपाबाबत पुनर्तपासणी करुन निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना देण्यात आलेले आहेत.

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने निवासी लेखापरिक्षण विभाग यांच्यामार्फत २०११ मध्ये करण्यात आलेल्या लेखापरिक्षणामध्ये या प्रकल्पात म्हाडाचे सुमारे १००० कोटीचे नुकसान संभवत असल्याबाबत नमूद करण्यात आले होते. तथापि, त्यानंतर ऑडिट मसुदा परिच्छेद दि. २५.५.२०१२ अन्वये म्हाडाचे २९६.६५ कोटी इतके नुकसान संभवत असल्याचे नमूद केले आहे.

सदर प्रस्तावाचा आढावा घेऊन त्यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे, असे वाटल्याने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दि. १६.५.२०११ रोजी नोटीस जारी केली.

तद्नंतर उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दि. १८.१.२०१४ रोजी संबंधित संस्था व विकासकाला नोटीस देऊन म्हाडास प्रत्यक्ष गुंतवणूक, बांधकाम क्षेत्रफळ व पुनर्वसन क्षेत्र, संक्रमण गाळयाचे क्षेत्र तसेच वाढीव जमिनीच्या क्षेत्राच्या च.क्षे. नि.मधील ५० टक्के वाटा मिळून एकूण २, २८, ९६१.१३ चौ. मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ म्हाडाचा हिस्सा म्हणून उपलब्ध करुन देण्यास कळविले.

मुळ विकासकाने अन्य विकासकांना विक्रीच्या बांधकाम क्षेत्रफळाची विक्री केल्याचे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या निदर्शनास आल्याने मुंबई मंडळाने मुळ विकासक आणि संबंधित गृहनिर्माण संस्था यांच्याकडून दि. २२.१०.२०१४ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती / स्पष्टीकरण मागविण्यात आले असून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

संयुक्त पुनर्विकास प्रस्तावाच्या अनुषंगाने करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग होत असल्याने म्हाडा पुनर्वसन हिश्श्याचे बांधकाम पूर्ण करुन ताब्यात देईपर्यंत विकासकास उपलब्ध होणार विक्रीयोग्य क्षेत्रफळाच्या बांधकामास स्थगिती देण्यात येऊन दि. १८.०४.२०१५ च्या पत्रान्वये संस्था व विकासक यांना विक्रीसाठीच्या बांधकाम क्षेत्रफळावर म्हाडामार्फत Stop Work आदेश जारी करण्यात आले आहेत.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) नगरपरिषदेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६०) * ७९११ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) नगरपरिषदेतील दैनंदिन कामकाजात आधीच अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे अधिकाऱ्यांअभावी पालिकेची विकासकामे प्रलंबित असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नगरपरिषदेतील ८६ मंजूर पदापैकी २६ पदे रिक्त असल्यामुळे या अपु-या कर्मचारी वर्गामुळे काम करणा-या कर्मचा-यांना यामुळे नागरीकांच्या तक्रारी, अडचणी, समस्यांचे निवारण करताना त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात ताण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३)

- सांगोला नगरपरिषदेची आस्थापना खर्चाची सन २०१४-१५ या वर्षाची टक्केवारी ७४% इतकी आहे. प्रचलित धोरणानुसार ती टक्केवारी ६०% इतकी आणल्यास नियमानुसार रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेस्तरावरुन करण्यात येईल.
- नगरपरिषदेतील ८६ मंजूर पदांपैकी विविध संवर्गातील २६ पदे रिक्त आहेत.
- सद्यःस्थितीत वर्ग-३ मधील १) कार्यालीन निरिक्षक २) अंतर्गत लेखापरिक्षक ३) विद्युत अभियंता ४) जलदाय मलनिस्सारण अभियंता अशी एकूण ४ पदे कर्मचाऱ्यांच्या बदलीद्वारे जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत भरण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील राळेगांव तालुक्यातुन वर्धा जिल्हयात दारु पुरवली जात असल्याबाबत

**(६१) * ७६२१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयात दारुबंदी असुन यवतमाळ जिल्हयातील राळेगांव तालुक्यातुन म्हणजेच जिल्हा सिमेमधून वर्धा जिल्हयात दारु पुरवली जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही जिल्हयातील सिमेवर असणाऱ्या पोलिसांचे मात्र याकडे दुर्लक्ष सुरु असल्याचे स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा दोषी, दुर्लक्ष व अभय देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) असल्यास, सिमेवरुन होणारी दारु तस्करी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) नाही.

(३) पोलीस अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष झाले नसल्यामुळे कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) सिमेवरुन होणारी दारु तस्करी रोखण्याबाबत खबऱ्यांमार्फत माहिती गोळा करण्यात येते व मिळालेल्या माहितीच्या आधारे छापे घालण्यात येवून संबंधित आरोपीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येते. तसेच वेळोवेळी नाकाबंदी करण्यात येवून तपासणी करण्यात येते व इतर आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विविध भागात विकासाआड येणाऱ्या ७०० झाडे तोडण्यासाठी वृक्षप्राधिकरण समितीने दिलेल्या परवानगीबाबत

**(६२) * ७८३२ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील नाहूरगाव, माहिम, वांद्रे, अंधेरी, सांताक्रुझ, गोरेगाव, चेंबूर, विक्रोळी आदि भागात विकासाआड येणारी ७०० झाडे तोडण्याबाबत वृक्षप्राधिकरण समितीने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान विकासकांना परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षप्राधिकरण समितीने कोणकोणत्या जातीची झाडे तोडण्याबाबत परवानगी दिली आहे,

(३) असल्यास, या झाडांचे आयुर्मान किती आहेत,

(४) असल्यास, यापैकी किती झाडाचे पुर्नरोपण करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, ज्या झाडांचे पुनर्रोपण केले नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

वृक्ष प्राधिकरण समितीच्या दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या सभेत विकासकामात बाधीत होणारी ४५ झाडे कापण्यास व २३६ झाडे पुनर्रोवित करण्यात मंजुरी देण्यात आली आहे.

(२) वृच प्राधिकरण समितीने विकासकामात बाधित होणारी चिंच, बदाम, नारळ, करंज, आंबा, निलगिरी, जांभूळ, फणस, शेवर, अशोका, भेंडी इ.जातीची झाडे कापण्यास परवानगी दिली आहे.

(३) या झाडांचे सरासरी आयुर्मान ३० ते ५० वर्षे इतके असते.

(४) २३६ झाडांचे पुनर्रोपण करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलीस खात्यातील अकार्यक्षम वाईट प्रतिमेच्या पोलिसांवर कारवाई करण्याबाबत

**(६३)** * ८२८६ **श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोलीस खात्यातील अकार्यक्षम वाईट प्रतिमेच्या पोलिसांची यादी बनविण्याचे काम शासनाने माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यादी बनविण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, सदर यादीत किती व कोणकोणते पोलीस कर्मचारी अकार्यक्षम व वाईट प्रतिमेचे असल्याचे आढळून आले आहे,

(४) सदर पोलीस कर्मचारी/अधिकारी यांचा तपशील काय आहे, तसेच त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे सिडकोमार्फत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(६४) * ६७०५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) या परिसरात सिडकोमार्फत पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको जाणूनबुजून कमी दाबाने पाणी पुरवठा करुन कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोमार्फत करण्यात येणारा पाणी पुरवठा सुरळीत व योग्य दाबाने करण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) नवी मुंबई महानगरपालिकेकडून "कामोठे" विभागास अतिरीक्त ५ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा दिला असून सद्य:परिस्थितीत ३५ ते ३७ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे.

कामोठे सेक्टर ८ येथे नुतन बृहत संतुलित जलकुंभातून उदंचन संचाद्वारे जलवितरण होत असून, जलवाहिनीतील दाब वाढला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून त्वरीत अतिरिक्त ३ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा होण्याकरीता नळ जोडणी मंजूर केलेली असून त्यासाठी जलवाहिनीचे काम हाती घेण्यात आले आहे.

-----------------

## पुण्यातील शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री.राम गावडे यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला

**(६५) * ६७३६ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री.राम गावडे यांच्यावर त्यांच्या घराजवळ दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास काही अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हल्लेखोरांना अद्याप अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार पुढे काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर घटनेबाबत आळंदी पोलीस ठाणे येथे दिनांक २१.४.२०१५ रोजी गु.र.क्र.५४/२०१५ भादंवि कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ८ आरोपींपैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित ४ आरोपींपैकी दोन आरोपींना मा.जिल्हा सत्र न्यायालय, पुणे यांचेकडून अटकपूर्व जामिन मंजूर करण्यात आला असून दोन आरोपी फरार आहेत. तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पळसावडी (ता.म्हसवड, जि.सातारा) येथील टाटा पावर सोलर एजन्सी विरोधात कामगारांनी बेमुदत उपोषण सुरु केल्याबाबत**

**(६६) * ७१४५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पळसावडी (ता.म्हसवड, जि.सातारा) येथील टाटा पावर सोलर एजन्सी विरोधात कामगारांनी बेमुदत उपोषण सुरु केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पळसावडे, देवापूर हद्दीतील हजारो एकर शेती प्रकल्पासाठी घेताना नोकरीचे अमिष दाखवले होते. मात्र या कामगारांच्या जमिनी कवडीमोल भावाने घेऊन त्यांना सुरक्षा रक्षकाची नोकरी देण्यात आली व सुरुवातीला १६ हजार रुपये दरमहा वेतन देणाऱ्या या कंपनीने या भूमिपुत्रांना पगार कमी करुन तो ७ हजारा रुपयांवर नेऊन ठेवला यामुळे सदरहू कामगारांची फसवणूक कंपनीने केली आहे हे पाहता शासन दोषींची चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि. १३/०४/२०१५ ते १५/०४/२०१५ या कालावधीत साखळी उपोषण करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

कामगारांच्या विविध मागण्यांवर कामगार, कंत्राटदार व मुख्य मालक यांच्यामध्ये तडजोड होऊन कामगारांचे वेतन व भत्यामध्ये वाढ करण्याबाबत निर्णय झाला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

### मालेगांव (जि.नाशिक) येथील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६७) * ९८५४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे दुषित पाणी व उन्हाच्या प्रकोपामुळे डायरिया प्रकोप होऊन माहे मे, २०१५ ते दिनांक २ जून, २०१५ पर्यंत तब्बल १ हजार ९८० जणांना त्याची लागण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन महिन्यापासून डायरियाची साथ मोठ्या प्रमाणात पसरली असतांनाही दुषित पाण्याचा प्रश्न कायम असल्याने जनता विविध आजाराने त्रस्त झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुध्द पाणी असल्याचा दावा करणाऱ्या जारच्या पाण्यामुळे डायरियाचा प्रादुर्भाव वाढला, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत जार व्यावसायिकांवर कोणती कार्यवाही न होणे, शहरास पिण्याचा पाणी पुरवठा करणाऱ्या गिरणा धरणात नदी प्रवाहाव्दारे अत्यंत दुषित तत्त्वाची रसायने पोहचणे, ठिकठिकाणी बेकायदेशिर नळ जोडण्या घेतलेल्यांनी मुख्य पाईपला छिद्र करणे, पाईपलाईन गळती आदि प्रकारामुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, डायरिया, गॅस्ट्रोसारख्या आजारांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने स्वच्छ पाणी पुरवठयाप्रश्नी प्रशासनाचे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, गिरणा नदी पात्राद्वारे गिरणा धरणात रक्त-मास व रासायनिक तत्व असलेले पाणी पोहचू नये तसेच अनधिकृत नळ कनेक्शन सक्तीने बंद करणे व पाण्याची चोरी व गळती थांबविणेबाबत खास कोणती कठोर उपाययोजना करण्यांत आलेली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मालेगाव महानगरपालिकेमार्फत होणारा पाणीपुरवठा शुध्द असून, सदर पाण्याची नियमितपणे रासायनीक व जैविक चाचणी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांचेमार्फत करण्यात येते.

तथापि, शहरात काही व्यावसायिक पाणी विक्रेत्यांमार्फत प्लास्टिक जार मधून विक्री केले जाणारे थंड पाणी दुषित असल्याच्या कारणास्तव, मालेगावमधील नागरिकांना डायरीया या साथीच्या रोगाची लागण झाल्याची बाब मे, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे.

(३) वरील पार्श्वभूमीवर प्लास्टीक जारमधून विक्री करण्यात येणाऱ्या पाण्याचे नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांचेकडून महानगरपालिकेने तपासून घेतले. सदर पाणी दूषित असल्याचा अहवाल त्यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर या जार व्यावसायिकांकडून विक्री केले जाणारे थंड पाणी पिण्यास आरोग्य असल्याने, त्यांच्याकडून ते विकत घेऊ नये असे महानगरपालिकेमार्फत स्थानिक वृत्तपत्रात नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

(४) अशा व्यावसायिकांवर योग्य ती कारवाई करण्याबाबत सहाय्यक आयुक्त, अन्न भेसळ नियंत्रण विभाग, नाशिक यांना दि. २५.५.२०१५ अन्वये महानगरपालिकेने कळविले आहे. याशिवाय संबंधित व्यावसायिकाविरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येत आहे.

मालेगाव महानगरपालिकेला गिरणा धरणापासून मिळणाऱ्या पाण्याची नियमितपणे जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांचेकडून तपासणी करण्यात येते. मात्र अशा पाण्यात दुषित तत्वाची रसायने तपासणीमध्ये आढळून आली नाहीत.

बेकायदेशीररित्या नळ जोडणी केलेले २५० प्रकरणे नियमित करण्यात आली आहे. मुख्य पाईपला छिद्र करणे, पाईपलाईन गळती होऊ नये, याबाबत महानगरपालिकेच्या भरारी पथकामार्फत संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येते.

(५) हे खरे नाही.

उपरोक्त भाग-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठयासंदर्भात नियमित पाणी नमुना तपासणी, प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जलशुध्दीकरण करण्यात येत असल्याने, प्रशासनाचे दुर्लक्ष होते, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(६) विविध मार्गाने होणाऱ्या पाण्याचे प्रदुषण रोखण्याकरिता मालेगाव शहराकरिता भुयारी गटार योजना राबविण्याचे नियोजन आहे. सदर योजना कार्यान्वीत झाल्यानंतर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नदीपात्रात गटारीद्वारे सोडण्यात येणारे दुषित पाणी, घरगुती सांडपाणी गोळा करुन, त्यावर योग्य ती प्रक्रिया करुन त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे शक्य होईल.

गिरणा धरणापासून जलशुध्दीकरण केंद्रापर्यत पाण्याची चोरी व गळती आढळल्यास त्या तात्काळ बंद करण्याची कारवाई भरारी पथकाद्वारे करण्यात येत आहे.

तसेच शहरातील बेकायदेशीर नळ जोडण्या नियमित करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या नोंदणीसंदर्भात**

**(६८) * ७०४३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील असंघटीत क्षेत्रात सुमारे ५५ लाख कामगार असून शासनाच्या अनास्थेमुळे केवळ दोन लाखांच्या दरम्यानच कामगारांची नोंदणी झाली असून यामुळे कामगारांसाठी सरकारकडे ३० हजार कोटी रुपयांची रक्कम उपकरांच्या माध्यमातून जमा असूनदेखील नोंदणीच न झाल्यामुळे लाखो कामगार विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंसघटीत कामगारांची प्रभावी नोंदणी होऊन सर्व असंघटीत कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीही कार्यावाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

राज्यातील असंघटित क्षेत्रापैकी बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांपैकी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे ३,६९,३१७ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. सदर नोंदीत बांधकाम कामगारांपैकी सुमारे ३,३६,००० कामगारांना विविध योजनांतर्गत मंडळामार्फत लाभ प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच बांधकामाच्या उपकरांतर्गत मंडळाकडे सुमारे रुपये ३०६५ कोटी इतका निधी जमा झालेला आहे व तो नोंदीत बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी वापरण्यात येत आहे.

(२) राज्यातील बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या जास्तीत जास्त कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी व्हावी या दृष्टीकोनातून मंडळामार्फत विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ अन्वये राज्यातील सर्वच क्षेत्रातील असंघटित कामगारांसाठी राज्यस्तरावर "महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ" स्थापन करण्याचे प्रस्तावित असून सदर मंडळामार्फत असंघटित कामागारांची नोंदणी करुन त्यांना कार्ड वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुसार नोंदणीकृत कार्डधारक असंघटित कामगार हे केंद्र शासन व राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेऊन शकतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील नागरीसुविधांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या भूखंडावर झालेले अतिक्रमण

**(६९) * ६७९८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर विकासाचा दुसरा आराखडा सन २००३ मध्ये मंजूर करण्यात आला त्यात नागरी सुविधासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या एकूण ८०४ भूखंडापैकी तब्बल ३०० राखीव भूखंडावर अनधिकृत बांधकामे गेल्या २८ वर्षात झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेने आरक्षित भूखंड वेळीच ताब्यात न घेतल्याने आरक्षित भूखंडावर बेकायदा बांधकामे झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) नुसार अतिक्रमण झालेले भुखंड रिक्त करुन ताब्यात घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिकेचा मंजूर केलेला विकास आराखडयात एकूण ८१३ आरक्षणे असून, त्यापैकी २२१ आरक्षणांचे जागेवर अनधिकृत बांधकामे असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) विकास योजनेतील खाजगी मालकीच्या आरक्षित जागा भुसंपादन अथवा टिडीआर अदा करुन संपादित करण्यात येतात. विकास आराखडयातील ८१३ पैकी २४९ आरक्षणे भागश: /पुर्णत: संपादीत केली आहेत.

विकास योजनेतील आरक्षणे विहित कार्यपध्दतीनुसार ताब्यात घेणे आवश्यक असते. परिणामी आरक्षित भुखंड ताब्यात न घेतल्यामुळे बेकायदा बांधकामे झाली असे म्हणणे संयुक्तिक नाही.
(३) विकास योजनेची अंमलबजावणी ही निरंतर प्रक्रिया असल्याने चौकशीची आवश्कयता नाही.
(४) व (५) सदर आरक्षणे कायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब करुन अतिक्रमण मुक्त करुन ताब्यात घेण्याबाबत तसेच सर्व आरक्षित जागेवर, त्या जागा आरक्षित असल्याबाबत व त्यावर अतिक्रमण/बेकायदा बांधकाम करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा आशयाचे फलक लावण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

याशिवाय विकास योजनेतील ज्या आरक्षित जागेवर झालेले अतिक्रमण हे सन २००० पूर्वीचे व झोपडपट्टी स्वरुपाचे आहे अशी जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातुन विकसीत होऊ शकतील तसेच काही अतिकमित आरक्षणे ही समुह विकास योजनेच्या तरतुदीनुसार विकसीत झाल्यानंतर सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध होऊ शकतील.

-----------------

## माओवादी हिंसाचाराला पुण्यातून पाठींबा मिळत असल्याबाबत

**(७०) * ८०४४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माओवाद्यांचे सद्याचे लक्ष पश्चिम घाट असून माओवादी हिंसाचाराला पुण्यातून पाठींबा मिळत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) राज्याच्या पश्चिम घाट परिसरात मुंबई, नाशिक, पुणे इ. शहरांचा समावेश आहे. या भागाच्या शहरी व औद्योगिक वसाहतीत माओवादी विचारसरणीचा छुपा प्रचार करण्याचा माओवादी प्रयत्न करीत असून दलितांच्या प्रश्नाविरुध्द आवाज उठविण्याचे भासवून दलित तरुणांना माओवादी आंदोलनात ओढण्याचे काम करित असल्याचे निदर्शनास आले आहे. नक्षलप्रणित कबीर कला मंचच्या माध्यमातून कला पथक व पथनाट्य तयार करुन माओवादी विचारांकडे तरुण-तरुणींना आकर्षित करण्याचे प्रयत्न करण्यात येतात. नक्षलप्रणित संघटनेच्या कार्यकर्त्यांवर १) पोलीस स्टेशन,

हरसुल येथे गु.र.क्र.७/१९९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २) दहशतवादविरोधी पथक पोलीस स्टेशन, मुंबई येथे गु.र.क्र. १९/२०११, गु.र.क्र. २०/२०११, गु.र.क्र. ११/२०१४ व गु.र.क्र. ७/२०१५ ३) पोलीस स्टेशन तळेगाव दाभाडे येथे गु.र.क्र. १६४/२०१३ ४) डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३०/२०१३ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नक्षलप्रणित संघटनांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात नक्षल गुप्तवार्ता संकलन करण्याकरिता नक्षल सेल तयार करण्यात आले आहेत. तसेच माहिती व जनसंपर्क कक्षाची स्थापना नक्षल विरोधी अभियान कार्यालयात करण्यात आली असून याद्वारे वेळोवेळी दैनिक वृत्तपत्रातून नक्षल विरोधी प्रचार व प्रसार करण्यात येतो. नक्षल संघटनेच्या रणनिती/ कार्यपध्दतीबाबत माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांना नक्षल विरोधी अभियान कार्यालय, नागपूर येथे तज्ज्ञांकडून विशेष प्रशिक्षण देण्यात येते.

-----------------

**मुंबईतील घाटकोपर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरील गल्ली क्र.१७ येथील भूखंडावर भाजी मार्केट उभारण्याबाबत**

**(७१) * ७७४० श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरील गल्ली क्र.१७ येथील सुमारे २ एकर भूखंड महानगरपालिकेने भाजी मार्केटसाठी आरक्षित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी भाजीमार्केट उभारण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर भूखंडावर डंपर माफीयांनी जुन्या इमारतीचे दगड, सिमेंट व इतर टाकावू सामान ठेवण्यासाठी करीत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त भूखंडावरील अतिक्रमण काढून टाकून त्याठिकाणी महापालिकेचे भाजीमार्केट उभारण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

बृहन्मुंबईच्या एस प्रभागाच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार मौजे घाटकोपर येथील न.भू.क्र.२/एच(भाग) व २/जी धारण करणारा भूखंड किरकोळ मंडई या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहे.

(२) सदर ठिकाणी महापालिका मंडई प्रस्तावित असून १.०० चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे महानगरपालिकेच्या वास्तूविशारदामार्फत आराखडे तयार केलेले आहेत.

(३) सदर ठिकाणी या विभागातील उपद्रव शोधकांची नेमणुक करण्यात आली असून सदर मैदानावर कोणीही दगड माती सिमेंट डेब्रीज टाकू नये याची काळजी घेणेत येत आहे.

(४) व (५) सदर ठिकाणी महापालिका मंडई प्रस्तावित असून १.०० चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे महानगरपालिकेच्या वास्तूविशारदामार्फत आराखडे तयार केलेले आहेत. सदर भूखंड महापालिका स्वत: विकसित करणार आहे.

-----------------

**मुंबईतील मोनोरेल प्रकल्पाबाबत**

**(७२) * ६८९२ श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जर्नादन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.अनिल परब, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी एमएमआरडीए मार्फत वडाळा ते चेंबूर आणि संत गाडगेमहाराज चौक ते वडाळा या दोन टप्प्यातील मोनोरेल च्या पथदर्शी प्रकल्पाच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असल्याचे निरीक्षण महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या अहवालात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर मोनोरेल प्रकल्पाचे महसुली उत्पन्न कमी असून इतर खर्च जास्त असल्याने हा प्रकल्प तोट्यात जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमएमआरडीएने सुरु केलेला मोनोरेल प्रकल्प सध्या तोटयात आल्याने प्रस्तावित असलेला ठाणे, भिवंडी व कल्याण येथे होणारा तीन हजार कोटींचा मोनोरेल प्रकल्प रद्द करण्यात आला असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मोनोरेल चे उत्पन्न वाढविण्याबाबत तसेच ठाणे, भिवंडी व कल्याण येथील प्रस्तावित मोनोरेल प्रकल्पासंदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही, निरीक्षण महालेखापरिक्षक (कॅग) यांनी त्यांच्या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, "सदर प्रकल्पामध्ये करारनाम्यामध्ये दिलेल्या तांत्रिक तपशिलामध्ये बांधकाम करताना काही बदल करण्यात आले आहेत." तथापि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तांत्रिक तपशिलामध्ये जे काही बदल करण्यात आलेले आहेत ते तज्ञ लोकांच्या सल्ल्याप्रमाणे करण्यात आलेले आहेत. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मार्गदर्शकतत्वानुसार प्रकल्प राबविण्यात आलेला आहे. प्रकल्पाचे बांधकाम करताना कोणत्याही प्रकारचे निकृष्ट साहित्य वापरण्यात आलेले नाही.तांत्रिक बदलामुळे होणारी तफावत कंत्राटदाराच्या बिलांमधून वजावट करण्यात आले आहे.

(३), (४), (५) व (६) मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु झाल्यानंतर मोनोरेलचे उत्पन्न वाढणे अपेक्षित आहे. ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गाकरिता मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या मेसर्स राईटस या सल्लागाराने सदर प्रकल्पाच्या तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यासानुसार सदर मार्गावरील दैनंदिन प्रवासी संख्या कमी असल्याने सदर प्रकल्प आर्थिकदृष्टया व्यवहार्य नाही, अशी शिफारस केली आहे. ठाणे-भिवंडी कल्याण मार्गाकरिता सार्वजनिक जलद वाहतुक व्यवस्थेचा या परिसरातील होणारा संभाव्य जलद विकास व प्रवाशांची संख्या विचारात घेवून तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल पुन्हा तयार करण्यासाठी मेसर्स डी अपोलोनिया, इटली व टीसीई, मुंबई यांची माहे एप्रिल, २०१५ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियुक्ती करण्यात आली असून सदर प्रकल्पाचा अंतिम मसुदा माहे जानेवारी, २०१६ पर्यंत अपेक्षित आहे.

-----------------

## पंढरपूर नगरपरिषदेने कुंडातील कचरा डेपोत नेला नसल्याबाबत

**(७३) * ७०१८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर येथील चंद्रभागा वाळवंट आणि वारकऱ्यांच्या राहुटयांसाठी नव्याने नियोजन करण्यात येणाऱ्या ६५ एकर परिसरात विशेष परिश्रम घेवून स्वच्छता मोहिम राबविण्यात आली मात्र नगर परिषदेने कुंडातील कचरा डेपोत नेलाच नसल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कचरा उचलण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२)

- पंढरपूर येथे भरलेल्या चैत्री यात्रेकरिता जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पंढरपूर नगरपरिषदेस अतिरिक्त मुनष्यबळ व कचरा वाहतूकीसाठी ६ ट्रक उपलब्ध करुन दिले होते.
- नगरपालिकेकडील ३५८ सफाई कर्मचारी यात्राकालावधीसाठी नेमलेले ४५० हंगामी कर्मचारी असे एकूण ८०८ कर्मचारी व १ अधिकारी यांच्याद्वारे नियमितपणे स्वच्छता करण्यात येत होती.
- त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत दि. ११ एप्रिल, २०१५ रोजी पंढरपूर शहरामध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली व शहरातील सर्व कचरा उचलण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अधिकृत तसेच अनधिकृत झोपडपट्यांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानातून शौचालये उभारण्याचा घेतलेला निर्णय

**(७४) * ६९२५ श्री.अनंत गाडगीळ, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अधिकृत झोपडपट्टयांबरोबरच अनधिकृत झोपडपट्यांमध्येही केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानातून शौचालये उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छता अभियानांतर्गत शहरातीलही अधिकृत व अनधिकृत झोपडपट्यांमध्येही शौचालये उभारण्यात येऊन महाराष्ट्र स्वच्छ अभियान राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील सर्व शहरे हगणदारी मुक्त करावयाची आहेत. त्यामुळे हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शहरांमधील जी कुटुंबे उघडयावर शौचास जात आहेत त्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

पात्र लाभार्थी अनधिकृत वसाहतीमध्ये अथवा अधिसूचित न केलेल्या झोपडपट्टीत रहात असेल तरीही त्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक १५ मे, २०१५ च्या शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

(२) राज्यामधील २६ महानगरपालिका व २३९ नगरपालिका/नगरपंचायती क्षेत्रामध्ये या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नरिमन पॉइन्ट ते कांदिवली यादरम्यानच्या समुद्रकिन्यावर राबविण्यात येणाऱ्या कोस्टल रस्ते प्रकल्पास अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने दर्शविलेला विरोध**

**(७५) * ७०९७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरिमन पॉइन्ट ते कांदिवली अशा २९ कि.मी लांब असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर राबविण्यात येणाऱ्या कोस्टल रस्ते प्रकल्पाला अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंजखोल येथील साठवण टाकीच्या दुरुस्तीबाबत**

**(७६) * ६९४२ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोतुर्डे धरणात महाड शहर व रायगड विभागातील २२ गावांना मे महिन्यांपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक असतांना करंजखोल येथील मुख्य साठवण टाकी भरुन वाहत असल्याने धरणातून येणारे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याने महाडवासीयांना भविष्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साठवण टाकीच्या दुरुस्तीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पाटबंधारे विभागाच्या मालकीचे असलेल्या कोथुर्डे धरणात नगरपरिषदेचे आरक्षण असून सदरील आरक्षणानुसारच महाड नगरपरिषद कोथुर्डे धरणातून पाण्याचा उपसा करते.

धरणावरुन येणारे पाणी करंजखोल येथील नगरपरिषेदच्या मालकीचे असलेल्या जलशुध्दीकरण केंद्रावर प्रक्रियेद्वारा शुध्द करुन शहरात वितरीत करण्यात येते.

सदरील जलशुध्दीकरण केंद्राच्या नजिकच्या टेकडीवर नगरपरिषदेची भूस्तरीय मुख्य साठवण टाकी असून ती सुस्थितीत आहे व त्यामधून पाण्याची कोणत्याही प्रकारची गळती होत नाही.

तथापि, जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी गाळण्याकरीता असलेले रॅपिड स्टँड फिल्टरद्वारे नागरीकांस स्वच्छ पाणी मिळण्याकरीता प्रति दिन बॅकवॉश प्रक्रियेद्वारा पाणी वापरुन स्वच्छ केले जाते.

तद्नंतर सदरील बॅकवॉश प्रक्रियेकरीता वापरलेले पाणी पिण्यायोग्य नसल्याने त्याचा बाहेर विसर्ग केला जातो.

वाहत असलेले पाणी हे मुख्य साठवण टाकीचे नसून बॅकवॉश प्रक्रियेकरीता वापरलेले व विसर्ग झालेले पाणी आहे.

(२) साठवण टाकी सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील रस्ता रुंदीकरणात येणारे विद्युत खांब हटविण्याबाबत**

**(७७) * ७२३१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे रस्ता रुंदीकरणासाठी मोहीम राबवून शहरातील १४ रस्त्यांचे रुंदीकरण केले असून या रस्त्यांवरील विद्युत खांब न काढल्यामुळे रस्ता रुंदीकरणाचा फायदा झाला नाही तसेच विद्युत खांब काढण्याचे पैसे खर्च कोण करणार या वादामुळे तीन वर्षांपासून रस्त्यांवरील विदयुत खांब हटविण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शहरातील विद्युत खांब रस्त्यांमधून हटविण्याबाबत शासनाने निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ही बाब अंशतः खरी आहे.

(२) रस्ता रुंदीकरणात येणारी विद्युत खांब काढण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत १४ ठिकाणी कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी ६ रस्त्यावरील विद्युत खांब काढण्याचे काम पूर्ण झाले असून सद्यःस्थितीत ४ ठिकाणी विद्युत खांब काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ४ कामे निधीच्या उपलब्धतेनुसार नजिकच्या काळात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षणाबाबत**

**(७८) * ६७६० अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षण क्रमांक १९२ कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ऑटो मोबाईल वर्कशॉप, आरक्षण क्रमांक १९२ जनावरांचा दवाखाना व वसाहत, आरक्षण क्रमांक १९४ राज्य शासनाचे कार्यालय, आरक्षण क्रमांक १९५ केंद्र शासनाने कार्यालय, आरक्षण क्रमांक १९७ माध्यमिक शाळा, १८ मीटर व २४ मीटर रुंद विकास योजनेप्रमाणे रस्ता व या आरक्षणाने बाधीत होत असलेल्या जागेच्या बदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) वितरीत करताना भूमी अभिलेख विभागाकडून प्राप्त नकाशाची महानगरपालिकेकडून शहानिशा तसेच सर्वेक्षण न करताच तसेच सदर जागेवरचे अतिक्रमण न हटविताच हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) मंजूर करणे, तसेच विकासकाकडून सदर जागेवर भरणी करण्याचे व वाडेभिंत बांधण्याची फी महानगरपालिकेकडून वसूल करण्यात आली असणे व सदर जागांवर अतिक्रमण केलेल्या नागरिकांनी सर्वेक्षण आक्षेप घेतलेला असल्याने भरणी व वाडेभिंत बांधण्यात आलेली नसल्याने केवळ विकासकाच्या फायद्यासाठी सदरचा टिडीआर बेकायदेशीरपणे मंजूर करणे, सदर जागेवरच्या उर्वरित टिडीआर मंजूर करु नये अशा विषयाची तक्रार करुनही नुकताच १०,५९५ चौ.मी. टिडीआर मंजूर करणे, या बेकायदेशीरपणे मंजूर केलेल्या टिडीआर प्रकरणी चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषदेत लक्षवेधीच्या चर्चेदरम्यान मा.मंत्रीमहोदयांनी १५ दिवसांत अहवाल मागवून दोषी व्यक्तींवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्वासनानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) या टि.डी.आर. प्रकरणांच्या मुळ संचिका आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून प्राप्त करुन घेवून, या सर्व प्रकरणांची सर्वकष तांत्रिक छाननी करुन, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार तपासणी करुन, या प्रकरणांमध्ये अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास पाठविण्यासाठी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल दिनांक ३०/६/२०१५ रोजी प्राप्त झाला आहे.

(२) व (३) होय. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाला असून, त्याची छाननी सुरू आहे.

-----------------

**ठाणे येथील मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे कामाबाबत**

**(७९) * ७५३८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमिपूजन सन २०१५ या वर्षातच करण्यात येईल, अशी घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी अंदाजे २२ हजार कोटी निधींची आवश्यकता असताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) त्यासाठी केवळ १० कोटी इतक्या रकमेचीच तरतूद केली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००९ पासून ते आजतागायत ठाणे येथील विधिमंडळ सदस्य व लोकप्रतिनिधींनी आग्रही मागणी करत असताना देखील या प्रकल्पासंदर्भात कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहेत,

(४) तसेच, या प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वडाळा-घाटकोपर-तिनहातनाका (ठाणे) - कासारवडवली या सुधारित मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सप्टेंबर, २०१४ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आला असून या अहवालानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, अहवालास शासनाची मान्यता, जमीन अधिग्रहण उपयोगिता साधनांची कामे, केंद्र शासनाची मंजूरी तसेच सर्वसाधारण सल्लागाराची नेमणूक, निविदा प्रक्रिया इ. कामांकरीता सन २०१५ ते २०१७ इतका कालावधी अपेक्षित असून सन २०१७ ते २०२३ इतका प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. २० नोव्हेंबर, २०१४ रोजी मान्यता दिली असून त्यास राज्यशासनाची मान्यता देण्याच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**लातूर एमआयडीसीतील “उज्ज्वला प्रकल्प” या महिलांसाठीच्या वसतीगृहातील ४ मुली बेपत्ता झाल्याबाबत**

**(८०) * ७०६६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील “उज्ज्वला प्रकल्प” या महिलांसाठीच्या लातूर एमआयडीसीतील ए-४५ जागेत ५० जागा क्षमतेचे महिलांसाठीचे वसतीगृह मागास जनसेवा समितीद्वारे चालविले जाते या वसतिगृहात सध्या ४० मुलींचे वास्तव्य असून त्यापैकी ४ मुली बेपत्ता झाल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वसतिगृहामधून ४ मुली बेपत्ता झाल्याच्या एमआयडीसी, लातूर या पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारीनुसार या मुलींचा शोध घेण्यासंदर्भात शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

दि. २७/०४/२०१५ रोजी समुपदेशक, उज्वल प्रकल्प लातूर यांनी वस्तीगृहातून ४ मुली स्नान गृहाची खिडकी तोडून पळून गेल्याबाबत दिलेल्या अर्जावरुन पोलीस स्टेशन एमआयडीसी, लातूर येथे मिसींग क्र. ११/१५ दि.२७/०४/२०१५ रोजी दाखल आहे.

(२) व (३) सदर पलायन केलेल्या मुलींचा शोध घेणेसाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला मुलीच्या वर्णनासह तपास याद्या तसेच फोटोचे पॅम्पलेट पाठविण्यात येवून शोध घेणेबाबत कळविण्यात आले आहे. स्थानिक वृत्तपत्रात माहिती दिली आहे. तसेच नाशिक,बीड पोलीसांना शोध घेण्याबाबत कळविले आहे. लातूर शहरातील ग्रेन मार्केट, सर्व कॉलेज, ढाबे, रेल्वे स्टेशन, बसस्थानके, बाजारापेठा येथेही शोध घेण्यात आला आहे. पोलीस गॅझेट मध्ये पलायन केलेल्या मुलीचे फोटो पत्ते पाठवून शोध घेण्याबाबत कळविण्यात आले. तथापि अद्याप पलायन केलेल्या मुली मिळून आल्या नाहीत. शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील शिवाजीपार्क मैदांनातील संस्थांना भाडे तत्वावर दिलेल्या जागेवर अतिक्रमण केल्याबाबत

**(८१) * ७७०४ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवाजीपार्क मैदांनातील श्री समर्थ व्यायाम मंदीर, महाराष्ट्र स्टेट कब्बडी असोसिएशन, शिवाजी पार्क जीमखाना, गणेश उद्यान मंदीर, बंगाल क्लब आणि भारत क्रिकेट क्लब या संस्थांना मुंबई महानगरपालिकेने भाडेतत्वावर जागा भाड्याने दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत व त्यासाठी वार्षिक वा मासिक किती भाडे निश्चित केले आहे,
(३) तसेच उक्त संस्थापैकी शिवाजीपार्क क्लबने मंगलोरी कौलाच्या छपाराऐवजी आरसीसी स्लॅबचे बांधकाम व मंजूर आराखडा व्यतिरिक्त अनधिकृत तळघराचे बेकायदेशीर बांधकाम तर बंगाल क्लबने कालिका मातेचे मंदीर बेकायदेशीर बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (३) मधील अनधिकृत बांधकामाच्या विरोधात महानगरपालिकेने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रिक्त भूभाग सर्वसाधारपणे खालील प्रमुख अटी व शर्तीसापेक्ष भाडेपट्टीने देण्यात येतात:-

- महापालिकेच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही अतिरिक्त बांधकाम किंवा रिक्त भूभागाचा पुनर्विकास करु नये
- महापालिकेच्या पूर्व परवानगी शिवाय रिक्त भूभागाचा पोटभाडयाने देता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही.

शिवाजी पार्क येथील रिक्त भूभागांचे भाडे प्रति महिना पुढीलप्रमाणे आहे :-

१) श्री समर्थ व्यायाम मंदिर - रु. ७२/-
२) महाराष्ट्र स्टेट कबड्डी असोशियन - रु २१०८/-
३) शिवाजी पार्क जिमखाना - रु. ११०/-
४) गणेश उद्यान मंदिर - रु. १०३४/-
५) बंगाल क्लब - रु. ८६/-
६) भारत क्रिकेट क्लब - रु. ३२/-

(३) शिवाजी पार्क क्लबने मंगलोरी कौलाच्या छपराऐवजी आरसीसी स्लॅबचे केलेले बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केले आहे. तसेच सदर ठिकाणी कोणतेही तळघर अस्तित्वात नाही.

बंगाल क्लबने तेथील झाडाच्या बुंध्याला चिकटून एक छोटे कालिका मातेचे मंदिर उभारले आहे हे खरे आहे.

(४) बंगाल क्लब या संस्थेने बांधलेले कालिका मातेचे मंदिर सन १९५० पूर्वीचे असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर मंदिर संरक्षित वर्गामध्ये मोडत असल्यामुळे या बेकायदेशीर मंदिरावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातंर्गत पंपिंग स्टेशनचे बांधकाम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(८२) * ७१७१ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातंर्गत मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्यांची पावसाचे पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढली आहे. मात्र पंपिंग स्टेशनचे बांधकाम संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) मुंबईत आजही ४० सखल भागात हमखास पाणी तुंबते तसेच यावर्षी पावसाळ्यात २७ दिवस मुंबईत समुद्राला अधिक उधाण येणार असल्याचे सुचित करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबई शहर हे सात बेटे एकत्र येउन बसलेले असल्याने समुद्रसपाटी किंवा त्यापेक्षा खाली जमीनीची पातळी असलेली ४० ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत.ज्यावेळी ४.५ मीटर पेक्षा जास्त उंचीची भरती असते व पाऊस अधिक प्रमाणात येतो अशा वेळी सदर ठिकाणी काही कालावधीसाठी पाण्याचा निचरा संथगतीने होते.

मुंबई मेरीटाईम बोर्डाच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाकडून प्रसिध्द होणाऱ्या भरती व ओहोटी पुस्तकानुसार सन २०१५ वर्षातील मान्सून कालावधीत समुद्रास ४.५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता असलेले २७ दिवस निश्चित करण्यात आले आहेत.

(३) बृहन्मुंबईमध्ये पावसाळयांमध्ये होणाऱ्या पूरसदृष्य परिस्थितीवर मात करण्यासाठी महानगरपालिकेने ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गत पर्जन्य जलविहिन्यांमध्ये सुधारणा करण्याची एकूण ५८ कामे हाती घेतली आहेत.

ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील एकूण ५८ कामांपैकी आजतागायत २६ कामे पूर्ण झाली असून २९ कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित ३ कामांकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(४) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित कामे पूर्ण होण्यास विलंबाची प्रामुख्याने कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

अ) प्रकल्पाबाधित झोपडपट्टीधारकांची स्थानिक विभागात पर्यायी जागेसाठीची मागणी व स्थलांतरणास विरोध

ब) उदंचन केंद्रासाठी जमीन संपादन करण्यात येणाऱ्या अडचणी व सी.आर.झेड-१ च्या अनुषंगाने नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यास होणारा विलंब.

क) नाल्याच्या रुंदीकरणाच्या दरम्यान येणाऱ्या उपयोगिता सेवा वळविण्यात येणाऱ्या अडचणी व विलंब.

-----------------

## पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही

**(८३) * ७९७८ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी ठोस निर्णय घेऊन स्वतंत्र विभाग उभारणार असल्याचे पालकमंत्री पुणे जिल्हा यांनी पीएमआरडीएच्या बैठकीत माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सांगितले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकामांना वीज आणि पाणी पुरवठा नाकारण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार किती अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

पीएमआरडीए च्या दि. २९/५/२०१५ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या सभेमध्ये आकृतीबंधास अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार संवर्गनिहाय आकृतीबंध मान्यतेचा प्रस्ताव पीएमआरडीए ने दि. ०९/०६/२०१५ चे प्रत्रान्वये शासनास सादर केला आहे. या आकृतीबंधामध्ये "अनधिकृत बांधकाम विभाग" असा स्वतंत्र विभाग प्रस्तावित आहे.

(२) होय.

पीएमआरडीएच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांना विज आणि पाणीपुरवठा प्राधिकरणाच्या ना हरकत प्रमाणपत्रा-शिवाय देण्यात येऊ नये, असे संबंधित विभागांना कळविणे बाबत ही दि. ११/०५/२०१५ च्या सभेत ठराव पारित केला आहे. त्यानुसार पुणे जिल्हा परिषद महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व महाराष्ट्र जिवन प्राधिकरणास पीएमआरडीए यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

(३) प्राधिकरणाची नुकतीच स्थापना झालेली असून अ.क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनस्तरावर आकृतीबंध मंजूरीचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यास मंजुरी मिळालेनंतर अनधिकृत बांधकाम विभागात अधिकारी/कर्मचाऱ्यांची नेमणुक झालेनंतर अनधिकृत बांधकामावर कारवाई करता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राजपुरी (ता.मुरुड, जि. रायगड) कोळीवाड्यातील कुटुंबास वाळीत टाकल्याबाबत**

**(८४) * ८३२९ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजपुरी (ता.मुरुड, जि.रायगड) कोळीवाड्यातील वाळीतग्रस्त श्री.हरिदास बाणकोटकर यांचेवर गावक-यांनी दिनांक ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दुसऱ्यांदा हल्ला केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शिरगाव ता.मुरुड येथील श्री.कृष्णा सातमकर व त्यांच्या कुटुंबियांवर टाकलेल्या बहिष्काराबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर पोलीस अधीक्षक व पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी गावपंचायत अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य यांचेसोबत चर्चा करुन वाळीत प्रकरण मिटविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाळीत प्रकरण अद्याप न मिटता परत तसेच सुरू आहे अशा प्रकारची तक्रार श्री.कृष्णा सातमकर यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वाळीतग्रस्ताना संरक्षण देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) श्री.कृष्णा सातमकर यांनी तक्रारअर्ज सादर केला होता. परंतु याबाबत चौकशी करण्यासाठी ते हजर राहिले नाहीत.
(४) होय.
(५) राजपुरी (ता.मुरुड, जि.रायगड) कोळीवाड्यातील प्रकरणाबाबत मुरुड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२४/२०१५ भा.दं.वि.स. कलम १४३, १४७,१४९, ४२७, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दिनांक ११.०४.२०१५रोजी गुन्हा दाखल केला आहे.
शिरगांव (ता.मुरुड) येथील प्रकरणाबाबत शासकीय अधिका-यांनी संबंधितांसोबत बैठक घेतली. बैठकीमध्ये सदरचा वाद आपआपसात मिटविण्यात आला.

राजापुरी (ता.मुरुड, जि.रायगड) व शिरगांव (ता.मुरुड) येथील घटना वाळीत प्रकरणाच्या नव्हत्या.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील म्हाडाची घरे वापराविना पडून असल्याबाबत

**(८५) * ७६५६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात १.९ कोटी घरांची कमतरता असताना सुमारे १ कोटी २ लाख बांधलेली घरे वापराविना पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवडयात प्रॉपर्टी कन्सल्टंट संस्था असलेल्या सोनीआरईने तयार केलेल्या अहवालातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरवठा मागणी यांच्यातील व्यस्त प्रमाणचे प्राथमिक कारण असल्यामुळे अत्य अल्प उत्पन्न गटांना अधिकृत घर शक्य होत नाही यासाठी भाडेतत्वावरील घरे घेण्याकरिता रेंटल पॉलिसी ॲक्ट, २०१५ आणि मॉडेल टेनन्सी ॲक्ट २०१५ यांचा मसुदा तयार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मुंबईसह राज्यात अत्यल्प उत्पन्न व मध्य वर्गीयांसाठी स्वस्त व स्वत:ची घरे त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे व याबाबत शासनाची भुमिका काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झाल्याचे या विभागाच्या अभिलेख्यात आढळून येत नाही.

(२) सद्यस्थितीत राज्य शासनाद्वारे रेंटल पॉलिसी ॲक्ट २०१५ व मॉडेल टेनन्सी ॲक्ट २०१५ यांचा मसुदा तयार करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन नाही. परंतु केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मूलन मंत्रालयाने मॉडेल टेनन्सी ॲक्ट, २०१५ चा मसुदा तयार केला असून त्या संदर्भात राज्य शासनाचे अभिप्राय अपेक्षिले आहेत.

(३) म्हाडा, सिडको इत्यादी संस्थांद्वारे राज्यात अत्यल्प उत्पन्न गट, मध्यम वर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटाकरीता घरकुल निर्मिती करण्यात येते. याशिवाय विकास आराखड्यामध्ये उपलब्ध असलेल्या रिक्त शासकीय जमिनीवर पब्लीक हाऊसिंग/हाय डेन्सिटी हाऊसिंग करीता आरक्षण करणे, नविन वसाहत धोरण, म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास, म्हाडाच्या वसाहतींचा पुनर्विकास, म्हाडाच्या वसाहतींचा पुनर्विकास, केंद्र शासनाच्या 'सर्वांसाठी घरे २०२२' अंतर्गत उपलब्ध पर्यायातून अपेक्षित गृहनिर्मितीद्वारे सदनिकांची उपलब्धता करण्यात येत आहे.

पुढील पाच वर्षात विविध पर्यायांच्या माध्यमातून अशा गटाकरीता घर निर्मिती करण्याच्या उद्देशाने नविन 'गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५' चे प्रारुप तयार करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड पूर्व, खोत डोंगरी येथील सर्व्हे क्र.२८८ नगर भूमापन क्र.५२१ ते २३६ येथे झोपडपट्टी पुनर्विकासाचे सुरु असलेले नियमबाहय काम

**(८६) * ८२११ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पूर्व, खोत डोंगरी येथील सर्व्हे क्र.२८८ नगर भूमापन क्र.५२१ ते २३६ येथे झोपडपट्टी पुर्नविकासाचे सुरु असलेले नियम बाहय काम आणि ३३/३८ च्या नोटीसा यासंबंधी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील तक्रारीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) विकासकाने केलेले गैरप्रकार लक्षात घेता त्यावर कोणती कारवाई करणार ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मा. लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ३० मार्च, २०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) उपरोक्त निवेदनामध्ये खोत डोंगरी को.ऑप.हौ. सोसायटीच्या मालकीची जमीन नसतांना संस्था नोंदणीकृत करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेशी संबंधित संस्थेशी झालेला जमिन व्यवहार योजनेचे एकूण क्षेत्र , क्षेत्राचे सिमांकन, योजनेंतर्गत समाविष्ट झोपड्यांची संख्या, झोपडीधारकांची पात्रता/अपात्रता, जमिन मालकी संदर्भात खातरजमा न करता संस्था नोंदणी , निष्कासनाची होत असलेली कार्यवाही, संक्रमण शिबीरांची विकासकाकडून व्यवस्था न होणे इत्यादी मुद्दे समाविष्ट आहेत.

(३) व (४) मा. लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक ३० मार्च, २०१५ रोजीच्या निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देण्यात आल्या होत्या. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नुकताच दि. १४.७.२०१५ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला असून त्यामध्ये सकृतदर्शनी विकासकाने कोणतीही नियमबाह्य कृती केलेली नाही, असे स्पष्ट केले आहे.

-----------------

## राज्यातील पोलीस कर्मचारी शासकीय निवासापासून वंचित असल्याबाबत

**(८७) * ९१०५ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१९२ ला दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कार्यरत असणा-या २ लाख १९ हजार ९६६ पोलीस कर्मचारी अधिका-यांपैकी तब्बल १ लाख ३३ हजार ४५१ पोलिस अजूनही शासकीय निवासापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या ४१६९४ पोलीसांपैकी २० हजार २६४ मुंबई पोलीस आजही घरांच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून घरापासून वंचित असलेल्या पोलीसांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) पोलिस दलात कार्यरत असणा-या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना शासनाच्या निधीतून, वित्तीय संस्थाच्या माध्यमातून कर्ज उभारणी करुन, पोलीस कर्मचा-यांच्या सहकारी गृह निर्माण प्रकल्पांना प्रोत्साहन देवून निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील नगररचना विभागातील दोन अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडल्याबाबत**

**(८८) * ९२५०    श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शरणापूर (ता.जि.औरंगाबाद) येथील ३० गुंठे जमिन एन ए करण्यासाठी ५ लाख रुपयांची अवैध रक्कम घेताना नगररचना विभागातील दोन अधिका-यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास पकडल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर लाचखोर अधिका-यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्‌याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौ.शरणापूर येथील गट नं.८ मधील तीस गुंठे शेतजमिनीचे रेखांकन मंजूर करण्यासाठी रु.५,००,०००/- इतकी लाचेची रक्कम स्वीकारले संदर्भात नगररचना व मूल्य निर्धारणा विभाग, औरंगाबाद येथील दोन अधिका-यांना दिनांक १२/०४/२०१५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्‌वारे पकडण्यात आले आहे.

(२) होय.

(३) व (४) तक्रारदार श्री.खंडोबा हनमंतराव बिरादार यांच्या मौजे शरणापुर येथील गट नं.८ मधील तीस गुंठे शेत जमीनीचे रेखांकन मंजूर करण्यासाठी रु. ५,००,०००/- लाचेची मागणी करुन ती श्री.टोपे, सहाय्यक नगर रचनाकर यांचेमार्फत स्वीकारल्या बाबत लोकसेवक श्री.प्रसाद सोनबा गायकवाड, सहाय्यक संचालक व श्री.संजय यशवंतराव टोपे, सहाय्यक नगर रचनाकर यांना दिनांक १२/०४/२०१५ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

या संदर्भात त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन उस्मानपुरा, औरंगाबाद शहर येथे गु.र.क्र. ३००९/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही लोकसेवकांना दिनांक १३/०४/२०१५ रोजी अटक करण्यात आली. सद्य:स्थितीत मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

**राज्यातील तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या ३० टक्के कैद्यांना मानसिक आजार असल्याबाबत**

**(८९) * ९७७१ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या ३० टक्के कैदयांमध्ये मानसिक आजार असल्याचे तुरुंग विभागाच्या अहवालातून दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कैदयांच्या आजारावर आळा घालण्यासाठी काही उपाययोजना आखली आहे काय, असल्यास, कोणती,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्रातील कारागृहात माहे मे,२०१५ अखेर त्यापैकी ७८९९ शिक्षाधीन बंदी बंदीस्त असून त्यापैकी ४८० बंदी मानसिक आजार असलेले बंदी आहेत. त्याचे प्रमाण एकूण बंदीसंख्येच्या तुलनेत ६ टक्केपेक्षा कमी आहे.

(२) संबंधित जिल्हा रुग्णालयातून मानसोपचार तज्ञ येवून नियमितपणे बंदयाची कारागृहात तपासणी करुन औषधोपचार करत असतात. आवश्यकतेनुसार बंदी रुग्णास मनोरुग्णालयात दाखल करुन ओषधोपचार व मानोसोपोचार करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही,

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात बालमजूर कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(९०) * १०५२९ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने बालमजूर कायदा केला आहे मात्र सदर कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याने यवतमाळ जिल्ह्यात शेकडो मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यात बालमजूर कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) बाल कामगार या अनिष्ट प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. त्यानुषंगाने ही अनिष्ट प्रथा नष्ट व्हावी या उद्देशाने शासनाने कृतिदलाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला असून अशा कृती दलामार्फत वेळोवेळी धाडसत्राचे आयोजन केले जाते.

यवतमाळ जिल्ह्यात अशा प्रकारचे कृतीदल अस्तित्वात असून सदर कृतीदलाने स्थापना झाल्यापासून आतापर्यंत जिल्ह्यात ८६ धाड सत्रांचे आयोजन करुन धाडी टाकल्या आहेत. अशा धाडींमधून उक्त कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांच्या मालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून आढळून आलेल्या बाल कामगारांची मुक्तता करण्यात आली आहे.

तसेच राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प समिती, यवतमाळ यांच्या द्वारे बालकामगारांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

**गंगाखेड येथील पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत**

**(९१) * ७२७५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड येथील पोलीस उपअधिक्षक श्री.कैंगार व इतरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक दरम्यान दलित कार्यकर्त्यांना उध्दटपणाची वागणूक देत मिरवणूक बंद पाडल्यावरुन तेथील कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री महोदय व पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडे सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रार अर्जाप्रमाणे चौकशी करुन दोषी विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, या प्रकरणी कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, या संदर्भात मे, २०१५ मध्ये तक्रार अर्ज केला आहे.
(२) व (३) पोलीस अधीक्षक, परभणी यांना प्राप्त तक्रारीबाबत चौकशी केली आहे. त्यानुसार असे निष्पन्न झाले की, मिरवणूकीसाठी डी.जे.वाद्यास मनाई व मिरवणुकीची वेळ याबाबतच्या अटी नमूद करुन फोव्यसं १४९ प्रमाणे संबंधित मिरवणूक मंडळास मिरवणुकीपूर्वी स्पष्ट सूचना दिल्या होत्या. तथापि, संबंधित मंडळाने गैरवर्तन करुन पोलिसांनी दिलेल्या सूचना पाळल्या नाहीत व मिरवणुकीत शस्त्रास्त्रे, डी.जे., वॉकी टॉकी वापरली व वेळेची मुदत संपल्यावरही मिरवणूक चालू ठेवली. तसेच पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना त्यांच्या कामात अडथळा निर्माण करण्याचे गैरवर्तन केल्याने त्यांच्याविरुद्ध पो.ठाणे गंगाखेड येथे गु.र.नं.११६/१५, भा.दं.वि.कलम ३५३, सह मुपोका कलम ३३ (डब्ल्यू), १३५ पर्यावरण अधिनियम, १९८६, कलम १५, सह भाहका कलम, ३, २५ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस अधिकारी वा कर्मचारी यांनी कोणतेही नियमबाह्य वर्तन केले नसल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात गोरगरिबांच्या विकासाकरिता महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या घरकुल अभिनव योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(९२) * ७३६२ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्यावतीने गोरगरिबांच्या विकासाकरिता घरकुल योजना हाती घेतली असून महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या अभिनव योजनेत गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस स्वाक्षऱ्या करुन घरकुल योजनेच्या १७ फाईल्स मार्गी लावण्याचा प्रकार आसीनगर झोन अंतर्गत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी बोगस स्वाक्षऱ्या केल्याचे निदर्शनास आल्यानंतरही दोषीं विरोधात अद्यापी तक्रार दाखल करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत दोषी आढळुन आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही, सदर प्रकरणी अध्यक्ष/सचिव सहारा बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांचे विरोधात पांचपावली पोलीस स्टेशन, नागपूर येथे आसीनगर झोन कार्यालयात या प्रकरणी तक्रार करण्यात आलेली आहे. पांचपावली पोलीस स्टेशन कार्यालयाकडून पुढील चौकशी सुरु आहे.

(४) वरील प्रमाणेच आसीनगर झोन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त आणि इतर अधिकारी यांचे वर उक्त प्रकरणी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली असून त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येईल.

-----------------

**अकोला महापालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(९३) * ७४०४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महापालिकेतील अतिमहत्वाची २८ अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमध्ये पर्यावरण संवर्धन अधिकारी व महिला व बाल विकास अधिकारी, समाज विकास अधिकारी, सिस्टम मॅनेजर, वैद्यकीय अधिकारी, महिला वैद्यकिय अधिकारी, युनानी चिकित्सक, लेखाधिकारी सांख्यिकी अधिकारी आदिंचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे असल्यामूळे त्याचा परिणाम शहराच्या विकास कामावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच महापालिकेत दोन उपायुक्तांची पदे रिक्त असून तूर्तास सर्व महत्वाच्या पदांवर प्रभारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २००१ मध्ये महापालिका अस्तित्वात येऊन १५ वर्षाचा कालावधी झाला असला तरी अद्यापि एवढ्या मोठया प्रमाणात पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(७) तदनुसार सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

अकोला महापालिकेकडील प्रस्तावानुसार, शासनामार्फत भरावयाची गट-अ ची एकूण १४ पदे व महापालिकेतर्फे भरावयाची अशी गट-अ ची २ पदे व गट-ब ची १२ पदे अशी एकूण २८ पदे रिक्त आहेत.

(२) होय.

(३) उपलब्ध अधिकारी/ कर्मचारी यांचेमार्फत महापालिकेचा कारभार नियमीतपणे व सक्षमपणे पार पाडला जात असून, याचा शहराच्या विकासावर परिणाम होत असल्याचे आढळून आलेले नाही.

(४) व (५) शासनाकडून तसेच महापालिकेकडून अशा पदांवर अधिकाऱ्यांच्या उपलब्धतेनुसार वेळोवेळी नेमणुका करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) आयुक्त, महानगरपालिका अकोला यांनी पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, शासनस्तरावरुन भरावयाच्या रिक्त पदांवर अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत, संबंधीत विभागांना विनंती करण्यात आलेली असून, यापैकी दिनांक ७/७/२००५ च्या आदेशान्वये नगर रचनाकार हे पद भरण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील खाजगी, महापालिकेच्या व म्हाडाच्या उपकर प्राप्त मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत

**(९४) * ७७८९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जर्नादन चांदूरकर, ॲड.अनिल परब, श्री.अनंत गाडगीळ, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजगी, महापालिकेच्या व म्हाडाच्या उपकर प्राप्त मोडकळीस आलेल्या अनेक इमारती या अतिधोकादायक असल्याने आगामी पावसाळ्यात त्या केव्हांही कोसळण्याची शक्यता असल्याचे महापालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणात नुकतेच माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) मुंबईतील हजारो उपकरप्राप्त धोकादायक इमारतीबाबत धोरण आखण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) मुंबईतील धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) राज्य सरकारच्या गृहनिर्माण धोरणात उपकरप्राप्त इमारती, जुन्या इमारती मधील भाडे नियंत्रण कायदा रद्द करण्याचा निर्णय राज्य शासन घेणार आहे, हे खरे आहे काय,

(६) उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एप्रिल २०१५ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणामध्ये ७१२ इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले आहे.

तसेच मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीच्या मंडळाने केलेल्या सन २०१५ सालच्या मान्सूनपूर्व सर्वेक्षणात १४ उपकर प्राप्त इमारती अतिधोकादायक आढळून आल्या आहेत.

(२) अतिधोकादायक आढळून आलेल्या ७१२ इमारतींना बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई मनपा अधिनियम १८८८ च्या कलम ३५४(१) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

त्यानुसार १५३ इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत. १८० इमारतींची विद्युत जोडणी व जलजोडणी खंडीत करण्यात आली आहे. तसेच ३७९ इमारती रिकाम्या करणे व निष्कासन कारवाई करणे याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कायदेशीर कारवाई चालू आहे.

(३) याबाबतचे गृहनिर्माण धोरण मसुदा स्वरुपात असून, या संदर्भात विधी मंडळ सदस्य, राज्यातील संसद सदस्य यांच्या शिफारशी व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

प्राप्त सूचना/शिफारशींच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) महापालिकेच्या मालकीच्या इमारतीमधील रहिवाशांची सदर इमारत तोडण्यापूर्वी पर्यायी व्यवस्था करण्यात येते. अन्य इमारती खाजगी मालकीच्या असल्याने सदर इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था इमारत मालकाने/रहिवाशांनी करावयाची आहे.

उपकरप्राप्त अतिधोकादायक भागातील रहिवाशांना संक्रमण शिबिरात हलविण्यात येते व इमारतीच्या दुरुस्तीबाबत/रिकामी करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येते, तसेच रहिवाशांना योग्य ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने सूचना देखील वृत्तपत्रांतून प्रसिध्द करण्यात येतात.

पावसाळयापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलेल्या १४ अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतींमध्ये २७७ निवासी व २६० अनिवासी असे एकूण ५३७ रहिवाशी/भाडेकरु आहेत.

२७७ निवासी रहिवाशी/भाडेकरु यांना स्थलांतरीत करण्याबाबत म्हाडामार्फत आवश्यक ते प्रयत्न करण्यात येत असून, त्यांना स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) याबाबतचे गृहनिर्माण धोरण मसुदा स्वरुपात असून, या संदर्भात विधी मंडळ सदस्य, राज्यातील संसद सदस्य यांच्या शिफारशी व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

प्राप्त सूचना/शिफारशींच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**मिरा-भाईंदर शहरातील वाहतुक पोलिसांची संख्या वाढविण्याबाबत**

**(९५) * ६९९३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर शहरातील सुमारे १५ लाख वस्तीत वाहनांची संख्याही मोठी असून या वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी फक्त दोन अधिका-यांवर असून फक्त ३५ कर्मचारी कार्यरत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील वाहतुकीचा विचार करता वाहतुक पोलिसांची संख्या वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मिरा-भाईंदर शहरातील सुमारे १५ लाख वस्तीत वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी काशिमीरा वाहतुक विभागात मे, २०१५ मध्ये २ अधिकारी, ९ सहा.पोलीस उपनिरीक्षक, ३६ पोलीस हवालदार, ३० पोलीस नाईक, १९ पोलीस शिपाई असे एकुण ९६ पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत असुन मदतीकरीता मिरा-भाईंदर महानगरपालीकेने ४० वार्डन दिलेले आहेत. त्यांच्या मदतीने शहरातील वाहतुकीवर नियंत्रण केले जात आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण करिता एकूण ४५२ पदे निर्माण करण्यात आली आहे. सदर पदांपैकी वाहतूक शाखेस ३ पोलीस निरीक्षक, ३ सहा. पोलीस निरीक्षक, ४ पोलीस उपनिरीक्षक, १३ सहा पोलीस उपनिरीक्षक, २३ पोलीस हवालदार, २३ पोलीस नाईक, ३१ पोलीस शिपाई अशी एकूण १०० पदे निर्माण करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोंढेतड (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अर्जुना नदीवरील पुलाचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत**

**(९६) * ८९७९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढेतड (ता.राजापूर, जि. रत्नागिरी) येथील अर्जुना नदीवरील पुलाच्या बांधकामासाठी रुपये ३ कोटी २० लाख खर्चाच्या प्रस्तावाला रस्ते अनुदानांतर्गत २ वर्षापुर्वी मंजूरी मिळून सदर पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम अपुर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

नगरपरिषद ठराव क्र. १४५ दि. २२/२/२०१३ अन्वये या कामासाठी देण्यात आलेल्या प्रशासकीस मंजुरीनुसार दि. २८/२/२०१४ अन्वये रु. ३.३० कोटी इतक्या रकमेचे कार्यारंभ आदेश झाले असून, तद्‌नूसार प्रत्यक्ष पुलाच्या बांधकामास सुरवात झालेली आहे.

(२) आतापर्यंत प्रस्तुत पुलाचे ३० टक्के इतके बांधकाम पूर्ण झाले आहे.

(३) प्रस्तुत पुलाच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात झाल्यानंतर, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दिलेल्या स्थगितीमुळे दि. १३/६/२०१४ ते दि. ३०/४/२०१५ पर्यंत पुलाचे काम बंद राहिले होते.

तसेच नगरपरिषदेने निधीचे नियोजन न करता, या पुलाचे बांधकाम सुरु केले असल्याचे दिसून येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथे आपत्ती व्यवस्थापन आराखडयाची अंमलबजावणी करणेबाबत**

**(९७) * ७९३५ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे येणा-या वारक-यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आराखड्याची तातडीने अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) पंढरपूर नगरपरिषदेने आपत्ती व्यवस्थापन आराखडा यशदा, पुणे या संस्थेकडून तयार करुन घेतलेला आहे. याबाबत यशदा पुणे यांनी आपत्ती व्यवस्थापन आराखडयामध्ये सुचविल्याप्रमाणे सदर आराखडयांची अंमलबजावणी करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलपूर यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर यांना सुचना दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील जलवाहिन्यांच्या दुरुस्ती करण्याबाबत**

**(९८) * ७६२८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथे तानसा जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेल्याची घटना ताजी असतानाच मुंबईतील घाटकोपर असल्फा येथे जलवाहिनीचा व्हॉल्व खराब झाल्याने लाखो लिटर पाणी वाया गेल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जलवाहिन्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १६ एप्रिल, २०१५ मध्ये जागृतीनगर घाटकोपर येथे ६० इंच व्यासाच्या जलवाहिनीवरील एअर व्हॉल्व खराब झाला होता. तथापि त्यामुळे या विभागात मोठ्या प्रमाणात गळती झालेली नसून लाखो लिटर पाणी वाया गेलेले नाही.
(२) दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी सदर जलवाहिनीची महानगरपालिकेमार्फत दुरूस्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चुनाभट्टी (मुंबई) येथील कॅडमॅक्स या इन्स्टिट्यूट चालकाने विद्यार्थ्यांची केलेली फसवणूक**

**(९९) * ७८२७ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॅडमॅक्स या इन्स्टिट्यूट मार्फत मशिन्स रिपेअरिंग करण्याच्या कोर्सच्या नावाखाली लाखो रुपये घेवून विद्यार्थ्यांची इन्स्टिट्यूट चालकाने फसवणूक केल्याची घटना चुनाभट्टी, मुंबई येथे घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इन्स्टिट्यूट चालकाने फसवणूक केल्याप्रकरणी विद्यार्थ्यांनी चुनाभट्टी पोलीस ठाण्यात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार करुनही सदर संस्थेवर पोलीसांनी गुन्हा दाखल केला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलीसांवर तसेच या इन्स्टिटयुट चालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) एप्रिल २०१५ मध्ये तक्रारदारांचा प्रकार अर्ज चुनाभट्टी पोलीस ठाणेस प्राप्त झाला असता, अर्जदारांनी नमुद केलेली घटना ही नवी मुंबईतील रबाळे पोलीस ठाणे हद्दीत घडल्याचे तपासअंती आढळून आल्याने तक्रारदारांचा अर्ज पुढील चौकशीकामी चुनाभट्टी पोलीस ठाणे मार्फत रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

सदरच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मुरुड (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीत अनधिकृत बांधकाम करुन शौचालयास जाण्याचा मार्ग बंद केल्याने श्री.दोडकुलकर यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिल्याबाबत

**(१००) * ९६५३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीत अनधिकृत बांधकाम करुन श्री.चिंतामण रामचंद्र दोडकुलकर यांच्या कुटुंबीयांना शौचालयास जाण्याचा मार्ग बंद केल्याने श्री.दोडकुलकर यांनी दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुरुड तहसिल कार्यालयाच्या आवारात आत्मदहन करण्याचे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकाम बंद करणेची कार्यवाही न करता मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या व्यक्तीला सहकार्य करीत असल्याने आश्वासन देऊनही नगरपरिषदेने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. परंतु सदरची बाब खाजगी मालमत्तेची असून तेथे मुरुड नगरपरिषदेने पहाणी केली असता शौचालय अस्तित्वात नाही. त्यामुळे शौचालयात जाण्याचा मार्ग बंद होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही. मुरुड नगरपरिषदेने अनधिकृत पडवीबाबत कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करुन दि. २०/१२/२०१२ रोजी पडवीचे बांधकाम पूर्णपणे तोडले होते. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी केवळ तात्पुरते बांबूचे मांडव असून ते काढण्याबाबतची कार्यवाही मुरुड नगरपरिषदेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पुणे येथे मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याबाबत

**(१०१) * ७०४७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : प्रश्न क्रमांक ३६९७ ला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे येथे असावे अशी सुमारे ३७ वर्षापूर्वी पासूनची मागणी असून त्यासाठी वकीलांनी, जनतेने, पक्षकारांनी अनेकवेळा आंदोलने केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मा. उच्च न्यायालयाचे पुणे येथे खंडपीठ निर्माण करण्यात यावे असा ठराव सन १९७८ मध्ये महाराष्ट्र विधीमंडळाने मंजूर केलेला असून सदर ठरावाची अंमलबजावणी अद्यापही शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा. उच्च न्यायालयाचे  खंडपीठ पुणे येथे स्थापन करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) यासंदर्भातील अंतिम कार्यवाहीसाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२), (३) व (४) मा.उच्च न्यायालयाचे पुणे येथे खंडपीठ निर्माण करण्यात यावे असा ठराव सन १९८७ मध्ये महाराष्ट्र विधीमंडळाने मंजूर केला आहे, हे खरे आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन खंडपीठासाठी पुणे बरोबरच कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, नाशिक इ.राज्याच्या विविध भागातून होणा-या मागणीस अनुसरुन या प्रयोजनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.मुख्य न्यायमूर्तींनी तीन न्यायमुर्तीची समिती गठीत केली आहे. सदर मागणी या समितीकडे सादर करण्यात आली असून या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो. ही बाब विचारात घेवून प्रलंबीत खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फीरते खंडपीठ (सर्किट बॅच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फीरते खंडपीठ (सर्किट बॅच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा अशी शिफारस मा.मुख्य न्यायमूर्ती उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

-----------------

### नाशिक विमानतळावरुन नियमित नागरीसेवा सुरु करण्याबाबत

**(१०२) * ९३३८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विमानतळावरील अत्याधुनिक प्रवासी टर्मिनलचे काम पुर्ण होवूनही येथून हवाई सेवा सुरु झाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विमानतळावरुन नियमित नागरी विमानसेवा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड व राज्य शासन संयुक्तपणे नाशिक जिल्ह्यातील ओझर येथे नागरी विमानतळ विकसीत करित असून त्याअंतर्गत विमानतळ प्रवासी इमारतीची उभारणी राज्य शासनाने केली आहे. सदर इमारतीचा ताबा माहे एप्रिल, २०१५ मध्ये हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडला प्रदान करण्यात आला आहे.

नागरी विमानतळाची उभारणी व नियमित हवाई सेवा सुरु करण्याबाबत सर्व आवश्यक कार्यवाही हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड द्वारे करण्यात येत आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील नगर रस्त्यावरील भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१०३) * ९१०३ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील नगर रस्त्यावर वडगावशेरी, रामवाडी चौकात मागील सात वर्षापासून भुयारी मार्गाचे काम सुरु होते, सदयस्थितीत सदरील काम पूर्ण न करता कायम बंद केले असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम अपुर्ण असल्यामुळे परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील भुयारी मार्गाचे काम पूर्णत्वास नेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर भुयारी मार्गाचे काम सुमारे ८० % पूर्ण झालेले आहे. कल्याणी नगर ते विमानतळाकडे जाणारी एकेरी मार्गिका वाहतूकीकरिता दिनांक १३.१०.२०१४ पासून रहदारीकरिता खुली करणेत आलेली आहे.

तथापि, वडगाव शेरी सं.नं. ३० पैकी श्री.हरिकीसन रामचंद्र आगरवाल व अन्य यांची मिळकत असून, श्रीमती हरपाईदेवी रामचंद्र आगरवाल व अन्य यांनी सिव्हील जज, सिनिसर डिव्हीजन, पुणे यांचे न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र. १६९६/२००८ मध्ये मा. न्यायालयाने “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच या प्रकरणी श्री. हरिकीसन रामचंद्र आगरवाल यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ३९८९/२०१५ दावा दाखल केलेला आहे.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने, विमानतळाकडून येणाऱ्या रस्त्याचे काम सद्य:स्थितीत थांबविण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर भुयारी मार्गाचे काम पूर्ण होऊन दिनांक १३.१०.२०१४ पासून भूयारी मार्गातून एकेरी वाहतुक सुरु करण्यात आली असल्याने, वाहतूकीची कोंडी सोडविण्यास मदत झाली आहे.

(३) प्रश्नाधीन जागेच्या संदर्भातील न्यायालयीन दाव्यामध्ये महानगरपालिकेची बाजू मांडण्यात येत असून मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार सदरचे काम पूर्ण करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

त्याकरीता पुणे महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकांमध्ये आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि. ठाणे) येथील भादवड,टेमघर परिसरात चार बोगस डॉक्टरांच्या दवाखान्यांवर महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी टाकलेला छापा**

**(१०४) * ७०९९ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथील भादवड, टेमघर परिसरात वैद्यकीय प्रमाणपत्र नसतांनाही गरीब रुग्णांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन औषध उपचार करण्यासाठी दवाखाने सुरु केलेल्या चार बोगस डॉक्टरांच्या दवाखान्यांवर महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी छापा टाकला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित चार बोगस डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भिवंडी (जि.ठाणे) येथील भादवड, टेंमधर या परिसरातील ४ बोगस डॉक्टरांविरुध्द शांतीनगर पोलिस स्टेशनमध्ये महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर ॲक्ट १९६१ चे कलम ३३ व ३६ मधील तरतुदीनुसार गु.र.क्र. ६१, ६२, ६३, व ६४ दिनांक २५.०४.२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे शहरातील पाच विकासकांकडून मालमत्ता कराची**
**थकबाकी वसूल करणेबाबत**

**(१०५) * ६९४८ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील पाच विकासकांकडून मालमत्ता करापोटी महापालिकेला ३० लाख रुपयांचे येणे बाकी असून यात सर्वाधिक १८ लाखांची थकबाकी लोढा बिल्डर यांची असल्याचे माहे २५ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विकासक यांचेकडून मालमत्ता कराची वसूली करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, ठाणे महानगरपालिकेच्या कर विभागाकडून स्थानिक वृत्तपत्रात दिनांक २५/३/२०१५ रोजी ४२ व्यक्ती/ संस्था यांची यादी मोठे थकबाकीदार म्हणुन प्रसिध्द करण्यात आली.

सदर यादीमध्ये श्री.मंगलप्रभात लोढा यांचे नावे रुपये १६,८३,६२३ व लोढा पॅराडाईज यांचे नावे रुपये १,३७,५१६ अशी एकूण १८,२१,१३९ इतकी रक्कम थकबाकी म्हणुन विर्निदिष्टित करण्यात आली.

श्री.लोढा यांचेकडून सर्वसमावेशक आरक्षणे विकास (ॲकोमोडेशन रिझेक्शन) योजनेखाली दिनांक ३१.१२.२००९ व दिनांक २१.०८.२०१४ रोजी महानगरपालिकेकडे सदर दुकाने, हस्तांतरित झाली आहेत. त्यामुळे सदर रक्कम संबंधिताकडून येणे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील जलकुंभांची झालेली दुरवस्था**

**(१०६) * ७२३२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील १४ लाख नागरिकांची तहान भागविण्यासाठी उभारण्यात आलेले ५२ पैकी बहुतांश जलकुंभ जुने झाल्यामुळे ते धोकादायक बनले आहेत अनेक जलकुंभाच्या पायऱ्यांना तडे गेले आहेत तर काही ठिकाणी सुरक्षेचा अभाव आहे पंम्पींग हाऊसचे दरवाजे मोडकळीस आले असून काचा, खिडक्यांचे नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील जलकुंभाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ही बाब अंशतः खरी आहे.

(२) शहरांतर्गत सद्या अस्तित्वात असलेले जलकुंभ हे सन १९७५-१०७६ व सन १९८४-१९८५ या कालावधीमध्ये बांधलेले आहेत. आवश्यकतेनुसार या जलकुंभाची देखभाल व दुरूस्ती समांतर जलवाहिनी या पी.पी.पी.प्रकल्पांतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे नेमण्यात आलेल्या कन्सेशनर मार्फत केली जात आहे. त्याचप्रमाणे शहरात समांतर जलवाहिनीच्या पी.पी.पी. प्रकल्पांतर्गत एकूण ३६ नवे जलकुंभ बांधण्यात येणार असून त्याअंतर्गत जुने आणि पडावयास आलेले जलकुंभ तोडून त्या ठिकाणी नविन जलकुंभ बांधण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या स्मारकाच्या दुरावस्थेबाबत

**(१०७) * ७५४० ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील प्रसिद्ध जाखमाता मंदिराजवळ (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे दिनांक ११ मार्च, १९८९ रोजी वा त्यासुमारास धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या स्मारकाचे भूमीपुजन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री तसेच गोवा राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाच्या उभारणीसाठी आतापर्यंत एकूण ८० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुनही या स्मारकाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिनांक २ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारकांच्या दुरावस्थेमुळे या स्थळाचा वापर गैरप्रकार करण्यासाठी केला जात असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी गेल्या २० वर्षांपासून ते आजतागायत तेथील नागरिकांनी व प्रसिद्धी माध्यमांनी वेळोवेळी मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद रत्नागिरी तसेच मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे निवेदन सादर करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर स्मारकाचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यास जबाबदार कोण व त्यांचे विरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे,

(६) तसेच सदर स्मारकाच्या सुशोभिकरण, संरक्षक भिंत, चौकीदार निवासस्थान, स्वच्छतागृह व तटबंदी आदी कामांबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नाधिन स्मारकाचे भूमीपूजन झालेले आहे.

(२) सदर स्मारकासाठी रुपये ५५.५७ लक्ष एवढा निधी उपलब्ध झाला होता. त्यामधून कामे पूर्ण करून छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्नाधीन निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) सदर कामे समाधानकारक झालेली आहेत. यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) सदर स्मारकाच्या इमारतीचा ताबा छत्रपती संभाजी राजे स्मारक समितीला दिलेला असून सदर इमारत त्यांच्या ताब्यात आहे. ती बंद अवस्थेत आहे. तेथे संरक्षक भिंत आहे. दिनांक १८.३.२०१५ रोजी अज्ञात व्यक्तीने या इमारतीच्या काचा फोडून व चौकीदाराच्या खालीच्या दरवाजाच्या कड्या तोडून खिडकीला लावलेल्या लाद्या उचकटून नुकसान केलेले आहे.

-----------------

## तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीच्या तीर्थ कुंडाची साफ-सफाई करणेबाबत

**(१०८) * ७०७९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीच्या मंगळवारी या स्थापत्य कलेचा आदर्श नमुना असलेल्या तीर्थ कुंडाची परिसरातील रहिवाशी कचराकुंडी म्हणून उपयोग करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर तिर्थकुंडात कचरा टाकण्यास प्रतिबंध व या कुंडाची साफ सफाई करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. सदर परिसरातील काही नागरिक घरातील देवासमोरील निर्माल्य मंकावती तीर्थ कुडामध्ये टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) भिंतीपत्रके लावून मंकावती तीर्थ कुंडात कचरा न टाकणेबाबत नगरपरिषदेने वारंवार त्या परिसरातील नागरीकांना सुचना दिलेल्या आहेत. तसेच या तीर्थ कुडांची नगरपरिषदे मार्फत नियमित स्वच्छता करण्यात येते.

-----------------

**राज्यात समुद्रकिनारी राहणाऱ्या सुशिक्षित मच्छिमार तरुणांची सागरी सुरक्षारक्षक म्हणून नेमणूक करुन त्यांना सेवेत घेण्याबाबत**

**(१०९) * ७१७७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समुद्रमार्गाने होणारे हल्ले रोखण्यासाठी समुद्रकिनारी राहणाऱ्या पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुशिक्षित मच्छिमार तरुणांची सागरी सुरक्षारक्षक म्हणून नेमणूक करुन त्यांना सेवेत घेण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मत्सव्यवसाय विभाग, गृह विभाग, तटरक्षल दल यांच्यामार्फत गस्ती नौका तैनात ठेवल्या आहेत. परंतु या गस्ती नौकेवरील काही कर्मचाऱ्यांना पोहता येत नाही, तसेच समुद्राचा अनुभवही नाही, समुद्राचे व किनारपट्टीचे हवामान मानवत नाही, त्यामुळे सदरील कर्मचारी हे सागरी सुरक्षा करु शकत नसल्याने मच्छिमार संघटनेने याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करुनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने प्रशिक्षित सुरक्षारक्षकाची नेमणूक करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पोलीसांना मदत करण्याकरीता सागरी किना-यावरील गावांमध्ये नागरिकांची सागरी सुरक्षा दले निर्माण करण्यात आलेली आहेत.

सदर सदस्यांना शासकीय सेवेत घेण्याबाबत शासनाकडे कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

पोलीस बोटीवर कार्यरत कायमस्वरुपी व कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेल्या सर्व कर्मचा-यांना पोहता येते. त्यांना वेळोवेळी बोटी बनविणा-या कंपनीकडून तसेच भारतीय नौदलाकडून प्रशिक्षण देण्यात येते. या व्यतिरिक्त ९८ तांत्रिक पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. सदर कर्मचाऱ्यांकडून दिवसरात्र गस्त घालण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मळेवाडा (जि.सिंधुदुर्ग) भागातील एका दांमपत्याने आपल्या चार महिन्याच्या मुलाला विकल्याची घडलेली घटना**

**(११०) * ८३३२ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मळेवाड कोंडुरा भागात राहणा-या एका दांम्पत्याने आपल्या चार महिन्याच्या मुलाला अवघ्या ५ हजार रुपयास विकल्याची घटना माहे एप्रिल २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) सदर प्रकरणी मळेवाड कोंडूरा भागात राहणा-या सावंत दाम्पत्याकडे चौकशी केली असता या दाम्पत्याने आंतरजातीय विवाह केला असल्याने ते मोलमजुरीचे काम करुन उदरनिर्वाह करत होते. त्यांच्याकडून मुलाच्या पालनपोषणाची व्यवस्था होत नसल्यामुळे त्यांनी बांदा शेले येथे राहणाऱ्या मेस्त्री कुटुंबाकडे त्या मुलाला पालनपोषणाकरिता ठेवलेला असून ते त्यांचे पालनपोषण करत आहे.

सदर मुलाला विकलेला नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घाटकोपर पूर्वेकडील (मुंबई) मानखुर्द-चेंबूर लिंक रोडवरील पीडब्ल्यू मैदानासमोरील सीटीसी नं.८२३ येथील झोपड्या पाडल्याबाबत**

**(१११) * ७६५८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर पूर्वेकडील (मुंबई) मानखुर्द-चेंबूर लिंक रोडवरील पीडब्ल्यू मैदानासमोरील सीटीसी नं.८२३ येथील खाडीवर भराव टाकून बांधण्यात आलेल्या व अनेक वर्षापासुन राहणा-या पारधी, वडार आदी भटक्या विमुक्त समाजातील मोजक्याच झोपड्या बुलडोझारच्या साहाय्याने पाडण्यात आल्याने झोपडीधारक बेघर होवून रस्त्यावर यावे लागल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील झोपडीधारकांकडे रेशनकार्ड, मतदानकार्ड व इतर सर्व पुरावे उपलब्ध असतांनाही महिलांना, मुलांना, गरोदर महिलांना तसेच पुरुषांना मारहाण व शिवीगाळ करीत बळाच्या जोरावर झोपडीतून बाहेर काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही ठराविक झोपडीधारकांच्याच झोपडया पाडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच उक्त झोपडीधारकांचे त्वरित पुनर्वसन करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

न.भू.क्र. ८२३ अ या सरकारी जमिनीवर अतिक्रमण झालेल्या एकूण १५५ झोपडीधारकांना उपजिल्हाधिकारी (अंति/निष्का), चेंबूर या कार्यालयाकडून दि. १२.०२.२०१५ रोजी नोटीस काढून पुराव्याचे कागदपत्र सादर करण्याची ७ दिवसाची मुदत देण्यात आली होती. त्यापैकी ३० झोपडीधारकांनी शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे पुराव्याचे कागदपत्र सादर केल्याने उर्वरित १२५ झोपडीधारकांना निष्कासनाबाबतचे आदेश दि. १७.०३.२०१५ रोजी पारित करण्यात आले होते. सदर आदेशात नमुद केलेली मुदत संपल्यानंतर प्रस्तुत ठिकाणावरील झोपडयांचे दि. २७.०४.२०१५ रोजी निष्कासन करण्याचे आयोजित करण्यात आले होते व त्याप्रमाणे एकूण ४ झोपडयांचे निष्कासन केलेले आहे.

(२) ज्या झोपडीधारकांनी सादर केलेल्या पुराव्याचे कागदपत्र शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे २००० पूर्वीचे आहेत, अशा झोपडीधारकांना निष्कासनाचे आदेश पारित केलेले नाहीत. तसेच कोणत्याही महिलांना, मुलांना, गरोदर महिलांना तसेच पुरुषांना मारहाण व शिवीगाळ करीत बळाच्या जोरावर झोपडीतून बाहेर काढले, हे खरे नाही.

(३) न.भू.क्र. ८२३ अ वरील ४ झोपडयांचे निष्कासन करण्यात आले. उर्वरित झोपडयांच्या नगर भूमापन क्रमांकाच्या हद्दीबाबत निष्कासनाच्या वेळी निर्माण झालेल्या साशंकतेमुळे सदर हद्दीबाबत शंकेचे निरसन होईपर्यंत उर्वरित झोपडीधारकांचे निष्कासन करण्याचे थांबविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील खार, मालाड, मढ, मालवणी, अंधेरी, मरोळ, गोरेगाव उपनगरात पुरेसा पाणीपुरवठा करणेबाबत**

**(११२) * ८२१६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील खार, मालाड, मढ, मालवणी, अंधेरी, मरोळ, गोरेगाव आणि जवळचा परिसर तसेच टेकडयावरील वस्त्यांमध्ये माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर मुंबईतील उपनगरात पुरेसा पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मुंबई उपनगरामध्ये पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहेः-

महानगरपालिकेने खार (पश्चिम) विभागात दिनांक २७.४.२०१५ पासून पाणी पुरवठ्याच्या वेळेत सकाळी ६.०० ते ९.०० असा बदल केला आहे. सदर बदल केल्यानंतर पाणी पुरवठ्यात सुधारणा झाली आहे.

अंधेरी मधील के/पूर्व विभागातील मरोळ मरोशी, एम.आय.डी.सी.झोनच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी दिनांक ६.४.२०१५ पासून एम.आय.डी.सी.झोनला पवई उच्च जलाशयातून स्थलांतरीत करुन, काही झडपा नियंत्रित करुन पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागातील जे.व्ही.पी.डी., बेहरामबाग, प्रथमेश कॉम्पलेक्स व विकासनगर या विभागांच्या जलवितरण वेळा या के/पूर्व विभागातील काही जलवितरण विभागांना समांतर असल्याने दिनांक ०६.०४.२०१५ पासून त्या वेगळ्या करण्यात आल्या आहेत. त्यानंतर सदर ठिकाणी पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा झाली आहे.

विलेपार्ले (प.) व अंधेरी (पश्चिम) येथील पाणीपुरवठा पूर्वीच्या दुपारी ४ ते ७ या वेळेऐवजी दुपारी ३ ते ५.३० वेळेत करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर ठिकाणी पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा झाली आहे.

मालाड पूर्व विभागातील अप्पापाडा व कुरार व्हीलेज येथील पाणी पुरवठा सुधारण्याकरिता ७५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम महानगरपालिकेमार्फत कार्यपथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर भागातील पाणी पुरवठ्यात सुधारणा होईल.

मढ, मालवणी भागाला पाणी पुरवठा सुधारण्यासाठी कांदिवली पश्चिम हा झोन, मढ झोन व मालवणी झोन मधून वेगळा करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील पाणी पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. तसेच ९०० मी.मी. व्यासाची नवीन जलवाहिनी लिबर्टी गार्डन टनेल ते लगून रोडपर्यंत टाकण्याचे महानगरपालिकेने प्रस्ताविले आहे. यासाठी निविदा मागविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गंभीर आणि महत्वपूर्ण गुन्हयाच्या तपासासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र विशेष पथक तयार करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(११३) * ९२५८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गंभीर आणि महत्वपूर्ण गुन्हयाच्या तपासासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र विशेष तपास पथक तयार करण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत राज्यात किती विशेष पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे व कोणकोणत्या पोलीस स्टेशनमध्ये केली आहे,

(३) अद्याप, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) या विशेष पोलीस पथकासाठी किती पोलीस अधिकारी/कर्मचा-यांची आवश्यकता भासणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमधील सत्र न्यायालयीन गुन्हयाच्या तपासाकरीता गुन्हे तपास पथक हे दिनांक ०१.०७.२०१५ पासून कायदा व सुव्यवस्था विभाग मधून वेगळे करण्याबाबतचे आदेश पोलीस महासंचालक यांनी दि. २४.०५.२०१५ अन्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांना दिलेले आहेत व त्यानुसार पोलीस घटकांतील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये अशा प्रकारे सत्र न्यायालयीन गुन्हयाच्या तपासाकरीता गुन्हे तपास पथक स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) आतापर्यंत राज्यात १३४९ गुन्हे तपास पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता राज्यातील सर्व पोलीस घटकांना दिनांक २४.०५.२०१५ अन्वये कळविण्यात आले असून कार्यवाही केल्याचा अहवाल दिनांक ०१.०८.२०१५ रोजी सादर करण्याच्या सूचना पोलीस महासंचालक कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत.

(४) सदर गुन्हे तपास पथकासाठी लागणारे मनुष्यबळ सध्या संबंधित पोलीस स्टेशनच्या मंजुर संख्याबळातुन पुरविण्यात येणार आहे. पोलीस घटकाकडून याबाबत कार्यवाही केल्याचा अहवाल दिनांक ०१.०८..२०१५ पर्यंत पोलीस महासंचालक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर याबाबतची अंतिम स्थिती अधिक सुस्पष्ट होईल.

-----------------

**भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील डागा कोल माईन्स परिसरातून केबल व लोखंड पोलिसांनी जप्त केल्याची घडलेली घटना**

**(११४) * ९७७२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील डागा कोल माईन्स परिसरातून केबल व लोखंड असे एकूण ३ लाख ९३ हजार रुपयांचा माल पोलीसांनी जप्त केल्याची घटना दिनांक १ जून २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व त्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

(अ) दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी रु. ५३ हजार किंमतीचा माल चोरीस गेल्याबाबत तक्रार करण्यात आली होती. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भद्रावती येथे गु.र.क्र. ७९/२०१५, भा.दं.वि. कलम ३७९, ३४ अन्वये दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

(ब) दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी रु. २ लाख किंमतीचा माल चोरीस गेल्याबाबत श्री.संजय दत्तात्रय अग्निहोत्री यांनी पोलीस स्टेशन भद्रावती येथे तक्रार केली आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भद्रावती येथे गु.र.क्र. ८०/२०१५, भा.दं.वि. कलम ३७९, ४११, ३४ अन्वये दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

(२) (अ) सदर प्रकरणी चौकशीअंती तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीस गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे व त्यांनी वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे व त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र तयार करण्यात आले असून ते मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी भद्रावती तेथे न्यायालयात दाखल करण्यात आले ओहे.

(ब) या प्रकरणी चौकशीअंती ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु. २ लाख किंमतीचा माल व इतर साहित्य तसचे १ इंडिका कार व १ मेटयाडोर जप्त करण्यात आली आहेत. त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र तयार करण्यात आले असून ते मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी भद्रावती तेथे न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.